









# प्रचिती दिव्यत्वाची

लेखक- अनिल अनंत वाकणकर,

श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा- रायगड.

# प्रचिती दिव्यत्वाची

## अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रचिती दिव्यत्वाची

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला व संस्थेला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रचिती दिव्यत्वाची

लेखक:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

Email-aawakankar@gmail.com

Mobile: 9011857414

ब्लॉग : https://aawakankar.blogspot.in/

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०२०

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# लेखकाचा परिचय

संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.



पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०. ईमेल aawakankar@gmail.com

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

पस्तिस वर्षे भारतिय टपाल खात्यांत नोकरी केली त्या नोकरीच्या काळांत अनेक प्रकारच्या लोकांशी प्रत्यक्ष संबंध आला. टपाल खात्याच्या या नोकरीत सतत माणसांना वाचण्याचा छंद लागला. व्यक्ती तितक्या प्रकृती अशी आपल्याकडे म्हण आहे. अशी अनेक प्रकारची प्रकृती असणाऱ्या माणसांना वाचण्याची संधी त्यामुळेच मिळाली. सेवानिवृत्त झाल्यावर ते वाचन कागदावर उतरवायला सुरवात केली. त्या माझ्या प्रयत्नांना ई साहित्य प्रतिष्ठानने प्रतिसाद दिला आणि माझी काही पुस्तके त्यांनी ई बुक स्वरुपांत प्रकाशित केली.

स्वत:चे लेखन:- ई साहित्य प्रतिष्ठान द्वारे पुढील साहित्य प्रकाशित झाले आहे.

१) **<u>वृक्षमंदिर</u>** ही दिर्घकथा अथवा लघु कादंबरी आहे. त्यात स्वाध्याय परिवार आणि समर्थ संप्रदाय यांच्या विचाराची सांगड घालुन सामाजिक वनीकरणातुन रोजगार निर्मिती हा विषय घेतला आहे.

२) **<u>सेवक भूषण</u>** या कथेत शासकिय सेवेत असताना समाजसेवा कशी करता येते याचा आदर्श सांगणारी पोस्टमनची कथा आहे.

३) **<u>दुर्गा कवच</u>** या कथेत महाड येथे झालेल्या सावित्री पुल दुर्घटनेच्या आधारावर कथा बेतली आहे.

४) **<u>भाऊबीज</u>** या कथेमध्ये दुकानदाराने फसवल्यावर ग्राहक म्हणून आपण काय करु शकतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

५) **<u>गुरु दक्षिणा</u>** या कथेमध्ये आपले शालेय शिक्षण जरी पूर्ण झाले तरी आपण शिकत होतो त्या शाळेकरीता काय करु शकतो हे दाखवले आहे.


६) **<u>ब्रह्मणस्पती विनायक</u>** या कथेमध्ये बेरोजगार युवक काय करु शकतो याचा लेखाजोखा मांडला आहे.

७) **<u>सुंदर हा देश</u>** हे मी केलेल्या काश्मिर, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि हरियाणा या भागातील सहलीचे प्रवासवर्णन केले आहे. त्यात जिथे जिथे गेलो तेथिल स्थान महात्म्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या सर्व पुस्तकांची कव्हर्स पुढील पानांवर असून त्यांचेवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडून आपण वाचू शकाल. एकच विनंती. आपण वाचलेल्या पुस्तकावर आपले मत (बरे अथवा वाईट) कळवावे.


हे सर्व साहित्य माझ्या https://aawakankar.blogspot.in/ या ब्लॉगवरसुध्दा उपलब्ध आहे.


अनिल अनंत वाकणकर,
श्रीवर्धन, जिल्हा-रायगड.




















पुस्तकाच्या कव्हरवर एक क्लिक करा. पुस्तक उघडेल.





# प्रस्तावना

॥ श्रीराम ॥

माझ्या आयुष्यात आतापर्यंत अनेक व्यक्ती आल्या. परंतु फार थोड्या मनाला भावल्या. त्या जणू माझ्या काळजातला एक कप्पाच झाल्या. त्यातिल मोजक्या काही व्यक्तींचे व्यक्तीचित्र मी माझ्या शब्दांत साकारले. फेसबुक, व्हॉट्स अँपवर मी ते वेळोवेळी प्रकाशित केले. अनेकांनी त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. काहिंनी मला अशीच व्यक्ती चित्रे रेखाटत रहा अशी प्रेमळ सूचना केली.

आपल्याला जशा व्यक्ती भावतात तशाच काही काही जागा देखील आपल्याला जीव लावतात. जणू त्या जागा आपल्या काळजात घरच करतात. त्याचप्रमाणे काही झाडे देखील आपल्या कुटूंबाचाच एक भाग बनतात. अशाच मला भावलेल्या व्यक्तींचे, एका नारळाच्या झाडाचे आणि भावलेल्या दोन जागांचे देखील व्यक्तीचित्र या पुस्तकांत समाविष्ट केले आहे.

अनिल अनंत वाकणकर,

श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा-रायगड.

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | लेखाचे नांव |
|---|---|
| १ | पद्मश्री विष्णू श्रीधर उर्फ हरिभाऊ वाकणकर |
| २ | श्रीवर्धनचे चितळे मास्तर |
| ३ | विश्वनाथ विष्णू तथा राजाभाऊ मेहेंदळे |
| ४ | हकिमबाबा |
| ५ | जयंत जयराम उर्फ बंधू केमनाईक |
| ६ | मोहाचा नारळ |
| ७ | रिलायन्स ग्रीन्स एक स्वप्ननगरी |
| ८ | शिवथर घळ सुंदरमठ एक अनुभव |

# १. पद्मश्री विष्णू श्रीधर उर्फ हरिभाऊ वाकणकर

दहा वर्षापूर्वी मला श्रीवर्धन तालुक्यांत रहात असणाऱ्या आम्हा वाकणकरांच्या चार घरांपलिकडे कोणी वाकणकर आहेत हेच माहित नव्हते. त्यानंतर अचानक माझ्या मनांत वाकणकर कुठे कुठे रहातात हे शोधावे असे आले. त्याकरीता प्रयत्न सुरु केले तेव्हा अक्षरश: वाकणकरांच्या माहितीचा धबधबाच समोर प्रकट झाला. वाकणकरांमध्ये अनेक दिग्गज व्यक्तिमत्वे होऊन गेली आणि सध्या देखिल आहेत. त्यामध्ये विशेष उल्लेख करायचा तर तो "**पद्मश्री डॉक्टर विष्णू श्रीधर तथा हरिभाऊ वाकणकर**" यांचा करावा लागेल**.** त्या हरिभाऊ वाकणकर यांची आज ४ मार्च रोजी पुण्यतिथी आहे. त्यांच्या या पुण्य स्मरणाच्या दिवशी त्यांच्या विषयी चार शब्द लिहून त्यांना आदरांजली वहावी म्हणून मी या लेखाचा प्रपंच केला आहे.

मी जेव्हा वाकणकरांचा शोध सुरु केला तेव्हा गुगल सर्च मध्ये नुसते वाकणकर नांव टाकले की, हरिभाऊंच्या बाबत माहिती असलेली अनेक पाने समोर यायची. या वर्षी हरिभाऊंची जन्म शताब्दी आहे. त्यानिमित्ताने संस्कार भारती तर्फे अनेक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. हरीभाऊंच्या

कार्याची आपल्या परिचितांना ओळख व्हावी हा या लेखाचा उद्देश आहे. हरिभाऊंच्या कार्याची नुसती ओळख करून द्यायची म्हटली तरी मला अक्षरष: घाम फुटला आहे. ते खरोखरच शापित गंधर्व होते. त्यांनी हातात घेतलेली प्रचंड कामे पाहिली की, आपण किती क्षुद्र आहोत याची जाणिव होते. तेव्हा आता नमनालाच घडाभर तेल वाया न दवडता त्यांचा आणि त्यांच्या कार्याचा अल्प परिचय करून द्यायचा प्रयत्न करीत आहे.

हरिभाऊंचा जन्म मध्यप्रदेशांतिल मंदसौर जिल्ह्यातिल निमच या गांवी दिनांक ४ मे १८१९ रोजी झाला. त्याचे प्राथमिक शिक्षण मध्य प्रदेशांतच झाले. शालेय जीवनापासूनच त्यांना कलेविषयी, विशेषतः चित्रकलेबद्दल, ओढ होती. त्यांना निरनिराळ्या ठिकाणी फिरून चित्रे काढायला व प्रवास करायला आवडत असे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून आदिवासींमधे समाजकार्य व शैक्षणिक कार्य करण्यासाठी ते घनदाट जंगलात जात असत. त्यांनी मुंबई येथे जी. डी. आर्ट केले.

त्यांनी अखिल भारतिय विद्यार्थी परिषदचे मध्यप्रदेश प्रांत प्रमुख म्हणुन काम केले होते. ते काही वर्षे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून काम करीत होते. राष्ट्रिय

स्वयंसेवक संघाचे मध्यप्रदेशातिलच असलेले जेष्ट स्वयंसेवक श्री मोरोपंत पिंगळे यांनी हरिभाऊंना भारतिय संस्कृतीच्या इतिहासाचे दर्शन सर्व जगाला होईल असे संशोधन करण्याची मुख्य प्रेरणा दिली. आता मी त्यांच्या जिवनातिल महत्वाच्या संशोधनाविषयी मला जमेल तशी थोडक्यांत माहिती देणार आहे.

## १) हरिभाऊंचे ऐतिहासिक संशोधन भिमबैठका येथिल कातळचित्रे(Rock Painting) आणि गुंफा(Rock Shelters).

१९५७ साली हरिभाऊ राष्ट्रिय स्वयंसेवक संघाच्या एका बैठकिला हजर रहाण्यासाठी नागपुरला जात होते. उज्जैनहून रेल्वेने नागपुर येथे जाताना त्यांची पॅसेंजर ट्रेन ओबेदुल्ला गंज या रेल्वे स्थानकात थांबली होती तेव्हा विंध्याचल पर्वत रांगांमध्ये त्यांना प्राचिन शिलाखंडांचा एक समुह दृष्टीस पडला. त्यांच्या अनुभवी नजरेने आणि त्यांच्यामध्ये लपुन बसलेल्या संशोधकाला त्यात विशेष काहीतरी आहे हे जाणवले. म्हणून त्यांनी आपला प्रवास अचानक संपवण्याचे ठरवुन ते तेथिल बरखेडा या रेल्वेच्या छोट्याशा स्थानकावर उतरले. नागर वेषातला कोणीतरी प्रवासी या जंगलातल्या छोट्याशा स्थानकावर उतरलेला बघुन

तेथिल स्टेशन मास्तर देखिल चकीत झाला. त्याने त्यांची विचारपुस केली आणि त्यांना त्या दुर्गम प्रदेशात रात्रीच्यावेळी न जाता दिवस उजाडल्यावर जाण्याचा सल्ला दिला. तेथे तो स्टेशन मास्तर एकटाच रहात होता. त्याने आपल्याबरोबर हरिभाऊंचे देखिल जेवण बनवले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी



पहाटेच हरिभाऊंनी त्या डोंगराकडे प्रस्थान केले.

तो दिवस होता २३ मार्च १९५७. हरिभाऊ जेव्हा जेव्हा अशाप्रकारे शोधकार्याला जात असत तेव्हा आपल्या खिशांत तिखटमीठ आणि बटाटे घेऊन जात असत. किंबहूना असे साहित्य त्यांच्याकडे कायमच असे. यावेळी देखिल त्यांच्या

सोबत असेच बटाटे होते ते त्यांनी वाटेतल्या जामुनजेरी नावाच्या एका नाल्याच्या कोरड्या पात्रातील वाळूंत पुरले आणि आपल्या पुढीला मार्गाला लागले. तेथे त्यांना एक दुर्गा मंदिर दिसले. त्या दुर्गा मंदिरात शालिग्रामदासमहाराज होते. त्यांच्याशी मुलाखत झाल्यावर ते देखिल हरिभाऊंच्या सोबत सर्व परिसर त्यांना दाखवायला गेले.

हरिभाऊंनी अनेक वर्षे आदिवासी विभागात आणि मध्यप्रदेशमधील खेडेगावातून संघाचे काम केलेले होते त्यामुळे त्यांना स्थानिक भाषा चांगल्या बोलता येत असत. डोंगराजवळ गेल्यावर त्यांनी तेथिल स्थानिक आदिवासींकडे या मोठाल्या कातळांविषयी चौकशी केली तेव्हा त्यांना त्यांनी अनेक दंतकथा सांगितल्या.

या शिलाखंडाचा आणि त्यातिल चित्रांचा संबंध पांडवांशी देखिल लावला जात असे. पांडव जेव्हा वनवासात होते तेव्हा ते या भागात रहात होते आणि येथे आजुबाजुला असलेली पठारे ही त्यांचे बैठकीचे स्थान होते म्हणून या भागाला भिमबैठका असे संबोधले जाते. या दंतकथेला अनुसरूनच येथे बाणगंगा नावाचे एक स्थान आहे. तशी बाणगंगा नावाची अनेक स्थाने भारतभर पसरलेली आहेत. पांडवांना लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न केला असा

महाभारतात उल्लेख आहे. त्याकथेला अनुसरून या वनविभागाला लाखाजुवार असे संबोधले जाते. त्याचप्रमाणे येथे पंडापुर आणि भिमपुर या नांवाची गांवे देखिल आहेत. दुसरी दंतकथा म्हणजे ही चित्रे जखणीने म्हणजे स्त्री भूताने काढली आहेत असा येथिल आदिवासींचा समज होता.

हरिभाऊंनी आपल्या मदतनिसांसह येथिल सर्व शैलचित्रांचा(Rock Painting) अभ्यास केला. त्यांचे विषयवार ग्रुप बनवले. त्यामध्ये शिकारीची, युध्दाची, धार्मिक प्रसंगाची, नृत्याची अशी विविध प्रकारची चित्रे होती. प्रत्येक प्रकारच्या चित्रांच्या समुहाला त्यांनी स्वतंत्र नावे दिली होती. आजही तिच नांवे तेथे प्रचलित आहेत. ते स्वत: चित्रकार होते, तसेच चित्रकला शिक्षक देखिल होते. त्यामुळे त्यांनी स्वत: आणि त्यांच्या चित्रकला विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्व शैलचित्रांचे स्केचेस काढले. आधुनिक कॅमेऱ्याच्या सहाय्याने त्यांचे चित्रिकरण केले.

या भागात एकुण सात ठिकाणी अशाप्रकारच्या गुंफा(Rock Shelter) आणि कातळचित्रे आहेत. त्यामध्ये तीस हजार ते दहा हजार वर्षांपूर्वी पासुनची चित्रे त्यांना आढळली. ही सर्व कातळचित्रे(Rock Painting) आणि गुंफा(Rock Shelter) नऊ किलोमिटर परिसरांत पसरलेल्या

आहेत. विध्यांचलाच्या १) विनायक, २) भोन्रावली, ३) भिमबैठका, ४) लाखाजुआर पूर्व ५)लाखाजुआर पश्चिम ६) झोंड्रा, ७)मुनीबाबकी पहाडी अशा सात टेकड्यावर  ही सर्व कातळ चित्रे(Rock Painting) आणि गुंफा(Rock Shelter) त्यांना आढळल्या होत्या.

आज आपण भिमबैठका येथे भेट देतो तेव्हा तिथे डांबरी रस्ता, प्रत्येक गुंफेपर्यंत जायला व्यवस्थित बांधलेली पायवाट अशा सुखासिन वाटेने जातो तरी आपल्याला दम लागतो. हरिभाऊंनी जेव्हा हे ठिकाण शोधून काढले तेव्हा तेथे माणसाची वर्दळ फार कमी होती. त्यामुळे पायवाटा त्यासुध्दा खाचखळगे, काटेकुटे यांनी भरलेल्या होत्या. त्यातच सर्वत्र हिंस्त्र श्वापदांचा मुक्त वावर होता. अशा परिस्थितीत हरीभाऊ सतत पंधरा वर्षे स्वत:ची शिदोरी बरोबर घेऊन तिथे जात होते संशोधन करीत होते. सर्व परिसराचे डॉक्युमेंटेशन करत होते.

या ठिकाणी एकुण ७६० गुंफा त्यांनी शोधून काढल्या. या सर्व गुंफांमध्ये अनेक प्रकारची चित्रे काढलेली होती. या ७६० पैकी जवळपास ५००च्यावर गुंफांमध्ये गुंफेच्या छतांवरही चित्रे काढलेली आढळली आहेत. या सर्व गुफामध्ये पुरातन काळातिल कलेचा नमुना असलेल्या चित्रांचा अक्षरष: खजिनाच हरिभाऊंना सापडला होता. ही चित्रे काढण्याकरीता

वापरलेले रंग वनस्पतींपासुन अथवा उपलब्ध असणाऱ्या खजिनांमधून म्हणजेच गेरु वगैरे नैसर्गिक साधने यांच्यापासुन बनवले होते. त्यामध्ये पांढरा, लाल आणि हिरवा रंग वापरल्याचे आपल्याला आढळते.

या चित्रांमध्ये ह्त्ती, घोडे, वाघ, शेतकरी, निरनिराळी शेतीची अवजारे, भाला, काठी यासारखी शिकारीची अवजारे यांची चित्रे आपल्याला आढळतात. आपण म्हणतो भारत मागासलेला देश आहे. परंतु तीस हजार वर्षापूर्वी जेथे बाकीचे जगच अस्तित्वात होते का नाही य़ाची खात्री नाही तेथे चिरंतन टिकणारी काळाच्या ओघात निरनिराळ्या नैसर्गिक आपत्तींना तोड देऊनही तगुन राहीलेली कलाकृती आज आपण येथे पाहू शकतो. या सर्व चित्रांमधून एक एक संदेश दिलेला असतो. ती ती चित्रे त्याकाळातल्या घटनांचे प्रतिनिधित्व करीत असतात. त्यामुळे या चित्रांना ऐतिहासिक महत्व आहे. या चित्रांना एक भाषा आहे, मात्र ती भाषा ओळखणारा तज्ञ तेथे पाहिजे, तोच या सर्व चित्रांतुन दिलेला संदेश उलगडु शकेल.


त्यानंतर १९७२ साली येथे पुरातत्वीय उत्खनन केले गेले. त्या उत्खननात हरिभाऊंना पाषाणयुगातिल हत्यारे सापडली. त्यामध्ये दगडाचे भाले, कुऱ्हाड अशी अनेक

प्रकारची हत्यारे होती. ती आपल्याला उज्जैन येथिल **"वाकणकर म्युझियम"** मध्ये पहायला मिळतिल. त्यावरुने येथे लाखो वर्षांपूर्वी देखिल मानवी वस्ती होती हे पुराव्याने सिध्द झाले आहे. या परिसरातील एका उत्खननात त्यांना एका छोट्या मुलाचे दहा हजार वर्षापूर्वीचे शव मिळाले. ते आतापर्यंत जगात मिळालेल्या शवांमध्ये सर्वात पुरातन आहे. त्याचा अभ्यास करण्याकरीता जगभरातुन अनेक संशोधक विक्रम युनिव्हर्सिटीमध्ये येतात.

या सर्व संशोधनाचे सादरीकरण त्यांनी फ्रान्समध्ये भरलेल्या पुरातत्वशास्त्रज्ञांच्या एका परिषदेमध्ये सर्वप्रथम सादर केले. युरोप अमेरिकेतही या सर्व चित्रांचे प्रदर्शन आणि सादरीकरण त्यांनी व्याख्यानांसह केले. त्यानंतर रितसर संशोधनानंतर युनेश्कोने त्यांच्या या संशोधनाला मान्यता दिली. भारतिय पुरातत्व खात्याने ऑगस्ट १९९० मध्ये भिमबैठकाला राष्ट्रिय वारसा स्थळ म्हणून घोषित केले. यानंतर २००३ साली या स्थळाला जागतिक वारसा म्हणून युनेस्कोने जाहिर केले.

या पाषाण चित्रांचे पुरातत्व शास्त्रानुसार रितसर संशोधन व्हावे या हेतूने हरिभाऊंनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील जेष्ट पुरातत्वशास्त्रज्ञ प्रा. एच्. डि. सांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली या गुंफाचित्रांवर शोधनिबंध सादर

केला. या त्यांच्या संशोधनाला पी. एच् डि देण्यांत आली. अशातऱ्हेने हरिभाऊ डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर झाले.



जगाने देखिल त्यांच्या या संशोधनाची दखल घेतली. त्यांना जगातिल अनेक देशांनी या आणि संशोधनाशी संबधित अनेक विषयांत मार्गदर्शन करण्या करीता त्यांना मानाने बोलावले होते. त्यांनी परदेशांत व्हरकोनियम या रोमन साईटवर इंग्लंड येथे १९६१ साली, फ्रान्स मध्ये इनकेलिव्ह येथे १९६२ मध्ये त्यांनी उत्खनन केले होते.

हरिभाऊंनी चार हजारपेक्षा जास्त कातळ शिल्पे, कातळ चित्रे शोधून काढली आणि त्यांचा अभ्यास केला. महेश्वर येथे १९५४ मध्ये, नावडा टोली येथे १९५५ मध्ये, इंद्रगड येथे १९५९ मध्ये, मनोटी आणि आवरा येथे १९६० मध्ये, कायथा येथे १९६६ मध्ये, आझादनगर आणि दंगवाडा येथे १९७४ मध्ये, रुनिजा येथे १९८० मध्ये पुरातत्वीय उत्खनन केले.



त्यांच्या या पुरात्तत्व क्षेत्रातिल भरीव कामगिरीकरीता भारत सरकारने त्यांना १९७५ साली पद्मश्री हा नागरी पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. असा हा युगपुरुष आमच्या वाकणकर घराण्यातिल आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. अर्थात अशा व्यक्तिंना कोणत्याही आडनावाचे, जातीचे,

पोटजातीचे अथवा धर्मापुरते मर्यादित करणे चूक आहे. कारण अशा प्रकारची दैवी संपत्ती लाभलेले पुरुष जगाचे सोयरे असतात.

**२. हरिभाऊंचे दुसरे ऐतिहासिक संशोधन गुप्त सरस्वती नदीचा शोध लावणे हे आहे.**

कोणत्याही संस्कृतीचा उगम आणि तिची भरभराट कोणत्यातरी नदीच्या सान्निध्यात होत असते. भारतिय संस्कृतीचा उगम देखिल अशाच एका नदीच्या किनाऱ्यावर झाला होता. आपण आतापर्यंत असे समजत आलो किंवा आपल्याला असे समजविण्यांत आले की, भारत या देशाचे नांव इंदू किंवा सिंधू या नद्यांच्या नावावरून देण्यांत आले. आणि भारतिय संस्कृती या नदीच्या तिरावर बहरली आणि वाढली. त्याला कारण मोहोदजरो आणि हडाप्पा येथिल उत्खननांत असे काही संदर्भ सापडले जे असे सांगु लागले की, आर्य हे या देशांतिल नसुन ते दुसऱ्या कुठुन तरी भारतात आले आणि त्यांनी आपली संस्कृती भारतावर लादली.


परंतु भारतिय संस्कृती अतिशय पुरातन आहे. वैदिक काळापासुन भारतिय सभ्यता जगाला माहित आहे. ती वैदिक संस्कृती सरस्वती नदीच्या किनाऱ्यावर बहरली. वसिष्ट,

विश्वामित्र यांच्यासारख्या महान ऋषींचे आश्रम सरस्वतीच्या तिरावर होते. आपण आपल्या परंपरेने जाणतो की, प्रयाग येथे गंगा, यमुना आणि सरस्वती या तिन नद्यांचे मिलन होते. म्हणून प्रयाग क्षेत्राला त्रिवेणी संगम हे नांव पडले. गंगा आणि यमुनेचे प्रवाह आपल्याला दिसतात परंतु सरस्वती नदीही गुप्त स्वरुपात तेथे आहे अशी आपली श्रध्दा आहे. सरस्वतीला वेदांची जननी असे संबोधले जाते.

या आपल्या भारतिय संस्कृतीचे अन्वेक्षण करून तिला परत राजसिंहासनावर बसविणे हे पद्मश्री डॉ. विष्णु श्रीधर तथा हरिभाऊ वाकणकरांचे जिवन ध्येय होते. त्या त्यांच्या ध्येयानुसार एक एक संशोधन करून ते भारतिय संस्कृतीचे नवे नवे पैलू जगासमोर आणत होते. त्यातलेच एक महत्त्वाचे संशोधन आहे, गुप्त सरस्वती नदीचा शोध. याकामी त्यांना स्वर्गीय बाबा साहेब आपटे आणि स्व. मोरोपन्त पिंगळे यांच्याकडून प्रेरणा मिळाली.

प्राचीन भारतात सरस्वती नदी सर्वात रुंद होती. इ. स.पूर्व ३००० ते २००० दरम्यान ती आधी अरुंद आणि मग लुप्त झाली. १९७० मध्ये अमेरिकन उपग्रहाच्या चित्रांमधून पश्चिम भारतातले पाण्याच्या मार्गाचे अवशेष प्रथम दिसले होते. त्या आधारे डॉ. वाकणकर यांनी उपग्रहाने पाठवलेली चित्रे

आणि प्राचीन साहित्य, पुरातत्व संदर्भांच्या आधारे अथक संशोधन केले होते आणि सरस्वतीचा एक संभाव्य मार्ग शोधून काढला. त्यांच्या संशोधनाला इतर शास्त्रज्ञांचा दुजोरा मिळाला आणि अधिकृत मान्यता मिळाली.




मानिय मोरोपंत पिंगळे यांच्या प्रेरणेने दिनांक १० फेब्रुवारी १९८३ रोजी वैदिक सरस्वती नदी या विषयावर कृष्णधाम, कुरुक्षेत्र येथे एक बैठक आयोजित केली गेली होती. या बैठकीचा उद्देश सरस्वती नदीच्या शोधासंदर्भात एक विस्तृत आराखडा तयार करणे हा होता. या बैठकीत निरनिराळ्या विभागांच्या, विशेषद्यांच्या आणि स्वंयसेवकांच्या सहकार्य़ाने या बाबतीत काय करता येऊ शकेल याचा देखिल आढावा घेण्यांत आला. या बैठकीचे उद्धाटन कुरुक्षेत्र

विश्वविद्यालयाच्या इतिहास, संस्कृती आणि पुरातत्व विभागाचे विभाग प्रमुख डॉ. उदयवीर सिंह यांनी केले होते. याच बैठकीत श्री हरि अनंत फडके यांनी सरस्वती नदी या विषयावर सांगोपांग माहिती देणारे भाषण केले होते. याच बैठकीत सरस्वती नदीचा तपशिलवार अभ्यास करण्यासाठी एक केंद्र स्थापन करण्यांत आले.

त्यानंतर लगेचच दिनांक १३ फेब्रुवारी १९८३ रोजी राज्यस्तरावरील बैठकीचे आयोजन करण्यांत आले. या बैठकीचे अध्यक्षपद संस्कृतमध्ये पंडित असणाऱ्या प्रोफेसर स्तानुदत्त शर्मा यांनी भूषवीले होते. त्या बैठकीत मोरोपंत पिंगळे, डॉ. हरिभाऊ वाकणकर, ठाकुर रामसिंहजी, यांनी मार्गदर्शन केले. यानंतर या विषयाचा मागोवा घेण्याकरीता १५ सदस्य असलेले मंडळ डॉ. ओमप्रकाश भारद्वाज यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यांत आले.

कोरड्या झालेल्या सरस्वती नदीचा मार्ग हिमाचल प्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि गुजराथ या राज्यांतुन जात असल्याचे चित्र उपग्रहामार्फत आलेल्या चित्रांमधून स्पष्ट होत असल्याने डॉ. हरिभाऊ वाकणकर यांच्या नेतृत्वाखाली मार्गदर्शक समिती तयार करण्यांत आली. त्यात पुढिल सदस्य होते. १) पद्मश्री डॉ. वि श्री वाकणकर, संयोजक, २) श्री

मोरोपंतजी पिंगळे, नागपुर, ३) श्री स्वराज्यप्रसाद गुप्ता, दिल्ली, ४) श्री रामचंद्र अग्रवाल,जयपुर, ५) डॉ. के. पी. धुरंधर, दिल्ली, ६) श्री ठाकुर रामसिंह, चंदीगढ, ७) पंडित श्रनुदत्त शर्मा, कुरुक्षेत्र, ८) प्रोफेसर बन्सीभाई सोनी, अहमदाबाद, ९) डॉ. सतिशचंद्र मित्तल, कुरुक्षेत्र, १०) पंडित चंद्रकांत बाली, दिल्ली, ११) पंडित प्रेमवल्लभ शास्त्री, गुजरात, १२) डॉ. सुरेंद्रकुमार आर्य, उज्जैन, १३) डॉ. भुवनेश्वर प्रसाद गुरुमैत्र, हिस्सार, १४) डॉ. नित्यानंद शर्मा डेहराडुन, १५) डॉ. ठाकुरप्रसाद वर्मा, काशी, १६) डॉ.सुमनवाहन पंड्या, आहमदाबाद, १७) डॉ जी. पी. देशमुख, जयपुर,

फेब्रुवारी १९८३ ते नोव्हेंबर १९८५ या काळात या विषयाचा प्राथमिक अभ्यास करणे, साधन सामग्री गोळा करणे या करीता व्यतित करावा लागला. त्यामध्ये लोकांशी संवाद साधणे, निरनिराळ्या ग्रंथांचा अभ्यास करणे, प्रश्नावली तयार करून त्यावर तज्ञांची तसेच सर्वसामान्य लोकांची मते जाणून घेणे, नकाशे तयार करणे, नकाशे जमवणे, स्थानिक लोकगीतांचा, कथांचा देखिल या मोहिमेत अभ्यास केला गेला. वैदिक वाङ्मय, रामायण, महाभारत या सारख्या ग्रंथामध्ये असलेले सरस्वती नदीचे तपशिल गोळा करून ते संगतवार लावणे हे काम देखिल या काळात करण्यांत आले.

या प्रकल्पाकरीता लागणार निधी लोकसहभागांतुन गोळा करण्यांत आला होता. त्याकरीता जाहिराती करणे, बैठकांचे आयोजन करणे, त्या बैठकांमध्ये मार्गदर्शन करणे या कामांत श्री मोरोपंत पिंगळे आणि डॉ. हरिभाऊ वाकणकर यांचा सिंहाचा वाटा होता. पुर्वतयारी म्हणून या दोघांनी सरस्वती नदीच्या पूर्ण मार्गावरील निरनिराळया ठिकाणांना अनेक वेळा भेटी दिल्या.

दिनांक १९ नोव्हेंबर १९८५ रोजी या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली. या कामांत पुढील तज्ञ सहभागी झाले होते. १) डॉ. वि.श्री वाकणकर, मार्गदर्शक, पुरातनता आणि पुरातत्व शास्त्रासंबंधी संशोधन, २) श्री मोरोपंत पिंगळे, प्रकल्पाचे व्यवस्थापन, ३) डॉ. के. पी. धुरंधर, भौगोलिक अभ्यास, ४) डॉ. वेदज्ञ आर्य, अभ्यासक, ऐतिहासिक संदर्भ आणि साहित्य, ५) डॉ. सुरिंद्र आर्य, लोककथा संग्राहक, ६) नारायण भाटी, पुरातन आणि मृत्तीका भाड्यांचे संग्राहक व अभ्यासक, ७) डॉ. भुवनेश्वरप्रसाद गुरुमित्र, प्रादेशिक माहिती संग्राहक, ८) श्री गोविंदजी खेकळे, व्हीडिओ रेकॉर्डींग, ९) श्री भैय्याजी सहस्त्रबुध्दे, बातमीदार, ९) श्री भय्याजी कस्तुरे, साहित्य संग्राहक आणि वितरक, १०) डॉ. सच्चिदानंद मित्तल, सर्वसाधारण मार्गदर्शन आणि मदत.

डॉ. वाकणकरांच्या नेतृत्वाने या तज्ञ सदस्यांच्या समितीने सरस्वती नदीचे उगमस्थान असलेल्या आदिबद्री पासुन सुरवात करून गुजराथमधील कच्छच्या रणापर्यंत प्रवास केला. या सर्व प्रवासात त्यांनी सरस्वती नदीच्या गुप्त प्रवाहाचा सर्वांगाने अभ्यास केला.

या समितीने आपल्या प्रदिर्घ अभ्यास दौऱ्याच्या अंती असे निश्कर्ष काढले की, १) वैदिक काळापासुन असलेली सरस्वती नदी हिमालयातिल आदि बद्री या स्थानी उगम पावली सुरवातिला तिची रुंदी ६ ते ८ किलोमिटर एवढी होती. २) त्यानंतर ती कटघर येथुन पश्चिम वाहिनी झाली. ३) त्यानंतर ती ठाणेश्वर, कुरुक्षेत्र, पोहवा, सिरसा, हंसी, अग्रोहा, हनुमानगढ, कालीबंगा, अनुपगढ आणि सुरतगढ या मार्गाने वहात वहात कच्छच्या रणाच्या प्रांतात आल्यावर दक्षिणवाहिनी झाली. ४) वेदांमध्ये उल्लेख केलेले अनेक आश्रम, राजे, जमाती आणि कुटूंबाचा संदर्भ हडप्पा काळातिल आहे. हडप्पा काळ हा वैदिक संस्कृतीशी मिळता जुळता आहे. ५) बिकानेर ते पंचभद्रा विभागामध्ये गारगोटी पासुन बनविलेली सुमारे दोन करोड वर्षांपूर्वीची हत्यारे सापडली. अशा प्रकारची हत्यारे त्या भागांतुन वेगाने भव्यप्रमाणात वाहणाऱ्या नदीच्या किनारीच सापडू शकतात. ६) गंगाक्षेत्र येथे अतिशय खोल स्थरामध्ये

मुलतानी मातीच्या थरांमध्ये या समितीला माशांचे जीवाश्म आणि पुरातन प्रजाती सापडल्या. यावरून असे सिध्द होते की, या भागात समुद्र होता. ७) या सर्व संदर्भांवरून अशा निश्कर्षाप्रत ही समिती आली की, सरस्वती नदी ही सर्व नद्यांत जास्त रुंद होती हडाप्पा काळापूर्वी आणि त्यानंतरही भारतिय संस्कृती तिच्या किनाऱ्यावर स्थिरावली आणि भरभराटीस आली. त्यामुळे आपण भारतिय संस्कृतीला सारस्वत संस्कृती असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल.

या समितीने केलेल्या संशोधनाचा परिणाम स्वरुप केंद्रिय भूमितल जल प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. डि. के. चड्ढा यांनी जुलै १९९९ मध्ये जेलसमेर जवळच्या आठ ठिकाणांच्या भूभौतिकिय सर्वेक्षणाच्या परिणामांच्या आणि उपग्रहिय सर्वेक्षणाच्या आधारावर असे जाहिर केले की, सरस्वती नदीचा पुरातन जलमार्ग जमिनीच्या ३० ते ६० मिटर खोलीवर अस्तित्वात आहे.

या सर्व संशोधन कार्यात पद्मश्री डॉ. वि. श्री. तथा हरिभाऊंनी अतोनात मेहनत घेतली. भारतिय संस्कृतीचे अन्वेक्षण व्हावे याकरीता त्यांनी केलेल्या प्रयत्नांत हा एक मैलाचा दगड ठरावा. या संशोधनाचा उपयोग नदी जोड प्रकल्पाच्या तयारीसाठी महत्वाचा महत्वाचा ठरला आहे.

*******

## ३. डॉ. हरिभाऊ वाकणकर यांचे तिसरे भारतिय संस्कृतीच्या दृष्टीने महत्वाचे संशोधन उज्जैन येथिल विश्वाचे नाभीस्थान असणारे नेमके स्थान शोधून काढणे.

पद्मश्री डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर यांचा तिसरा आणि भारतिय संस्कृती अन्वेक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा असलेला शोध आहे, उज्जैन येथिल कर्करेखा आणि स्थानिय रेखा ज्या ठिकाणी एकमेकांना छेद देतात ते या पृथ्वीचे मध्यवर्ती स्थळ असणारे नेमके जे स्थान आहे ते त्यांनी अभ्यासपूर्वक आणि परिश्रमपूर्वक शोधून काढले.

उज्जैन नगरीचे भौगोलिक स्थान अतिशय महत्वाचे आहे. खगोलशास्त्रज्ञांच्या मते याठिकाणी पृथ्वी आणि आकाश यांचा विचार करता बरोब्बर मध्यावर आहे. कालगणनेच्या दृष्टीने या स्थानाचे महत्व अनन्य साधारण आहे. प्राचिन काळापासुन ज्योतिषशास्त्राचे हे प्रमुख केंद्र आहे. राजा जयसिंहांनी या शहरात स्थापन केलेली वेधशाळा ज्याला सध्या जंतर मंतर या नावाने संबोधले जाते ती याचा पुरावा आहे.

पौराणिक काळापासुन उज्जैन येथे महाकालेश्वराची स्थापना केली आहे. हिंदूस्थानच्या बरोबर मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या उज्जैनचे स्थान हे विश्वाच्या नाभीस्थानी मानले जाते. महाकालेश्वराला कालगणनेचा प्रवर्तक मानले जाते. स्कंद पुराणात उज्जैनचे वर्णन, **आज्ञाचक्रं स्मृता काशी या बाला श्रुतिमूर्धनि। स्वधिष्ठानं स्मृता कांची मणिपुरम् अवंतिका।।** या श्लोकात केलेले आहे. अवंतिका म्हणजेच उज्जैनला या श्लोकात मणिपुर चक्र असे संबोधले आहे. या नगरीच्या भौगोलिक स्थानानुसार पुराणकालिन विद्वानांनी उज्जैन शहर हे शून्य रेखांशावर स्थापित आहे असे म्हटले आहे. या शहराच्या जवळच देशांतर रेखा आणि कर्क रेखा एकमेकांना छेदून त्याठिकाणी नैसर्गिक स्वस्तिक निर्मिती होते. ज्या ठिकाणी हे स्वस्तिक अस्तित्वात आहे ते महाकालेश्वराचे स्थान आहे अशी आपली श्रध्दा आहे. याच कारणाने भारतिय कालगणने करीता वापरण्यात येणारे पंचांगामध्ये उज्जैनची वेळ ही प्रमाण वेळ मानुन त्यानुसार तिथि वगैरे निश्चित केल्या जातात.

ज्योतिष विषयक सूर्य सिध्दांत या ग्रंथामध्ये राक्षसालयदेवौक: शैलयोर्मध्यसूत्रगा। रोहितकमवन्ती च यथा सन्निहित सर:। या श्लोकामध्ये भूमध्य रेखा रोहतक,

अवंती(उज्जैन) आणि कुरुक्षेत्र(सन्निहित) या स्थळांमधून जाते असा उल्लेख केलेला आहे. त्याचप्रमाणे देशांतर रेखा श्रीलंका पासुन सुमेरुपर्वातापर्यंत उज्जयिनी सहित अनेक नगरांना स्पर्श करून जाते.

या सर्व पार्श्वभूमिवर आंतरराष्ट्रीय प्रमाण वेळ ही उज्जैनली शून्य वेळ गृहित धरूनच कायम करणे आवश्यक होते. परंतु आपण ब्रिटिशांनी ठरवलेली कोणताही शास्त्राधार अथवा भौगोलीक आधार नसलेल्या ग्रीनीच या सदैव बर्फाळ भाग असलेल्या आणि जेथे सूर्यप्रकाशाची नेहमीच वानवा असते अशा स्थानावरील वेळेला प्रमाण आंतरराष्ट्रीय प्रमाण वेळ मानतो. हे दुर्दैवी आहे. हे सिध्द करण्याची जबाबदारी पद्मश्री डॉ. वि. श्री. तथा हरिभाऊ वाकणकर यांनी स्विकारली.


या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून त्यांनी असा निश्कर्ष काढला की, कर्करेषा जी उज्जैन नगरी मधून जाते तिच्या नेमक्या स्थानाचा शोध घेतला पाहीजे. त्यांनी केलेल्या खगोलशास्त्रिय गणितानुसार ती रेषा उज्जैनपासुन उत्तर दिशेला सुमारे ३० ते ३५ किलोमिटरच्या टप्प्यांत येते. तेव्हा त्यांनी डोंगला गावाच्या परिसरात १९८५ सालापासुन सतत दोन तिन वर्षे आपल्या सहकाऱ्यांच्या आणि डोंगला येथिल ग्रामस्थांच्या

सहाय्याने याचे सर्वेक्षण केले. आज ज्या ठिकाणी त्यांनी भास्कर यंत्र आणि शंकू यंत्र स्थापित केले आहे, त्या ठिकाणी त्यांच्या असे लक्षांत आले की, वर्षातला सर्वांत मोठा दिवस असतो त्या दिवशी या ठिकाणी ठराविक वेळी उभ्या केलेल्या शंकूची सावली शून्य होत आहे. त्यांनी प्रत्यक्ष प्रयोगाने हे सिध्द केले की, हीच ती जागा आहे, जेथे कर्क रेखा आणि स्थानिय रेखा( local longitude) एकमेकांना छेद देऊन तिथे स्वस्तिकाचा आकार तयार होत आहे.

या ठिकाणी आपल्याला असा प्रश्न पडू शकतो की, पुराणांत सांगितले आहे की, जेथे महाकालेश्वराचे लिंग स्थापित केले आहे तेथे अशाप्रकारचे स्वस्तिक आकार तयार होत आहे. परंतु पुराण कालानंतर कमीत कमी पांच हजार वर्षांत पृथ्वीची स्थिती देखिल बदलेली आहे. कारण आपण शिकलो आहे की, पृथ्वी २२ ते २४ इतकी झुकलेली आहे. त्यात कालानुरुप परिवर्तन होत आहे. सध्या तिता झुकण्याचे प्रमाणे २३ डिग्री आणि २६ मिनिटे इतके झुकलेले आहे. त्यामुळे महाकाल मंदिरापासुन हे अंतर वाढले असावे.


पद्मश्री डॉ. वाकणकरांनी नुसती ही जागा शोधून काढली नाही. तर या जागेचे महत्व प्रत्यक्ष डोळयांना दिसेल

अशी छोटी छोटी यंत्रे तयार करून त्यांनी येथे स्थापित केली. त्यामध्ये एक आहे, **शंकू यंत्र!** लहानपणी आपण आपल्या अंगणात एक काठी उभी करून तिच्या सहाय्याने सूर्याची सावली बघुन किती वाजले हे सांगत असू तसेच हे यंत्र आहे. किंवा जुनी माणसे सांगायची आता सावली या ठिकाणी आहे म्हणजे इतके वाजले. त्या पध्दतीने येथे एका वर्तुळाकार चौथऱ्याच्या मधोमधे एक रॉड किंवा लोखंडी शिग उभी केली आहे. वर्तुळाकार चौथऱ्यावर 21 जून कर्क संक्रंती, 21 मार्च/22 डिसेंवर, आणि २२ डिसेंबर मकर संक्रांती अशा तिन रेशा काढलेल्या आहेत. त्या रॉडची सावली सूर्याच्या भ्रमणानुसार प्रत्येक रेषेला स्पर्श करते त्यावरून व त्यावरून कालगणना केली जाते.


शंकू यंत्र


भास्कर यंत्र

दुसरे यंत्र आहे भास्कर यंत्र! अशाप्रकारचे यंत्र आपल्याला इतरत्र कोठेही पहायला मिळणार नाही. कारण त्याचा उपयोग फक्त या स्थाना पुरताच आहे. या ठिकाणी पृथ्वीच्या गोलामध्ये विशिष्ट ठिकाणी विशीष्ट कोनात म्हणजेच तेवीस डिग्री आणि सव्हीस मिनिटांच्या कोनांत एक पाईप बसवीलेला आहे. त्या पाईपाच्या दक्षिण बाजुमधून पाहिले असता अढळ असलेला धृवतारा आपल्याला वर्षातले तिनशे पासष्ट दिवस दिसतो. फक्त त्याकरीता आकाश स्वच्छ असायला हवे आणि काळोख असायला हवा. याशिवाय या यंत्रावर कर्करेखा काढली आहे. आणि शून्य रेषा काढलेली आहे. या ठिकाणी कर्करेषा आणि शून्यरेषा एकमेकांना छेद करतात व तिथे स्वस्तिकार तयार होतो. या स्थानाला हरिभाऊंनी विश्वाचे नाभीस्थान असे संबोधले आहे.



डॉ. व्ही. एस्. वाकणकर वेधशाळा , डोंगलाग्राम, उज्जैन,

डॉ. हरिभाऊ वाकणकर यांनी शोधून काढलेल्या या स्थानाच्या परिसरात मध्यप्रदेश सरकार तर्फे डॉ. वाकणकरांच्या नावाने वेधशाळा चालू करण्यांत येत आहे.

*******

आपण आतापर्यंत अनेक शोधांचे श्रेय परदेशी लोकांना देतो त्यातिल एक म्हणजे आपण आतापर्यंत असे वाचत आलो की, वास्को द गामाने भारताच्या सागरीमार्गाचा शोध लावला. परंतु डॉ. हरिभाऊंना लंडन मधील म्युझियममध्ये वास्को द गामाची डायरी सापडली त्यात त्याने लिहिले होते की, आफ्रिकेच्या किनाऱ्यावर त्याने असे एक जहाज पाहिले, तशाप्रकारचे जहाज त्याने त्यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. चौकशी केल्यावर त्याला समजले की, ते जहाज चंदन नावाच्या भारतियाचे आहे आणि तो व्यापाराच्या निमित्ताने नेहमी भारतातुन तेथे येत असतो. त्या चंदन नावाच्या व्यक्तिकडे वास्को द गामाने भारतात जाण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा त्याने तो लवकरच भारतात परत जाणार असल्याचे सांगितले. तेव्हा वास्को द गामा त्या चंदनच्या मागोमाग आपले जहाज घेऊन भारतात आला. यावरून वास्को द गामाने भारताच्या सागरी मार्गाचा शोध लावला हे खोटे ठरते.

पोंपेई ये रोम मधील शहर 79 A. D. मध्ये माईंट विसुवियसच्या ज्वालामुखीच्या राखेमध्ये गाडले गेले होते. सन 1979 मध्ये डॉ. हरिभाऊ तेथिल अवशेष पहायला गेले असता, त्यांना तेथे एका घराच्या अंगणात एक तुळशी वृंदावनासारखा अवशेष दिसला. त्यावर त्यांनी हे हिंदूमाणसाचे घर असावे असे विधान केले. ते म्हणाले अशा प्रकारचे वृंदावन हिंदूशिवाय दुसऱ्या कोणाच्या घरी असण्याची शक्यता नाही. कालांतराने हरिभाऊंचा हा तर्क खरा ठरला. त्या जागेमध्ये नंतर लक्ष्मीची प्रतिमा असणारा हस्तिदंती आरसा सापडला तो आरसा मराठवाड्यातिल तेरनावाच्या गावांत तयार केलेला होता. यावरून असे सिध्द होते की, 2000 वर्षांपूर्वीपासुन रोमशी भारताचे व्यापार संबध होते.

## ४) डॉ. हरिभाऊ वाकणकर यांचे भारतिय संस्कृतीच्या दृष्टीने महत्वाचे कार्य- संस्कार भारती या संस्थेची निर्मिती.

या संशोधनांच्या शिवाय त्यांनी विपुल कार्य केले आहे. संस्कार भारती ही संस्थेचे ते संस्थापक होते. मोठ्या आकाराची रांगोळी या पलीकडे संस्कार भारतीची फारशा लोकांना माहिती


नाही. त्या संस्कार भारतीची येथे थोडक्यांत ओळख करून देण्याचा प्रयत्न करणार आहे.

संस्कार भारतीची स्थापना २५ वर्षांपूर्वी लखनौ येथे झाली. **डॉ.हरिभाऊ वाकणकर** हे संस्कार भारतीचे संस्थापक सदस्य होते. मध्यप्रदेशात भोपाळ जवळ अतिप्राचीन आदिवासी चित्रकृतींचा शोध त्यांना लागला हीच अतिप्राचीन चित्रशैली असल्याचे त्यांनी सिद्ध केले अशा प्राचीन कलांचे संशोधन, रक्षण व संवर्धन करण्याच्या हेतूने संस्कृति रक्षणासाठी संस्कार भारतीच्या स्थापनेची गरज त्यांना भासली.

ललित कलांच्या माध्यमातून राष्ट्रीयत्वाचे संस्कार घडविणे व कलाकारांचे संघटन उभे करणे हे संस्कार भारतीचे कार्य होय। संपूर्ण भारतात १५०० स्थानी संस्कार भारतीचे कार्य चालू आहे.

नवोदित कलाकारांना त्यांची कला वृद्धिंगत करण्यासाठी शिबिरे, प्रात्यक्षिके, चर्चा, अभ्यास वर्ग, प्रश्नोत्तरे असे कार्यक्रम योजले जातात. यातून त्यांचा कलाविषयक दृष्टिकोन व्यापक करून कला प्रस्तुत करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. अशाप्रकारचे व्यासपीठ उपलब्ध झाल्या मुळे

कलाकारांचा आत्मविश्वास बळावतो व कलोपासनेच्या कृतार्थ व अर्थपूर्ण जीवनात तो रममाण होतो.




संस्कार भारतीच्या वतीने अनेक उपक्रम व कार्यक्रम राबवले जातात या शिवाय सर्व देशभर समान कार्यक्रमांची योजना केलेली आहें.

**वर्षप्रतिपदा - नववर्षारंभ -** हा कार्यक्रम गुढीपाडवा ते रामनवमी या कालावधीत होतो नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी एकत्र येणे, आपल्या संस्कृति प्रमाणे नववर्ष आहे ही भावना जागृत करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. अनेक ठिकाणी या दिवशी नवीन वर्षीच्या पहाटे उगवत्या सुर्याला अर्घ्य देण्याचे कार्यक्रम होतात.

**गुरु पौर्णिमा - नटराज पूजन -** या दिवशी जेष्ठ कलावंतांचे आशीर्वाद घ्यावेत व कलावंतांचा गुरु नटराजाचे पूजन करावे .या निमित्ताने गुरु शिष्य परंपरेचा वारसा टिकविण्याचे महत्कार्य संस्कार भारती करते आहे.

**कृष्णरूपसज्जा - गोकूळआष्टमी -** बाल कृष्णाचे लोभसवाणे रूप देऊन बालगोपाळांना कृष्णरूपात मंचावर आणणे , नाटय सादरीकरण , वेशभूषा स्पर्धा आयोजित करणे असे कार्यक्रम होतात.

**दिवाळी परिवार मेळावा -** दिवाळी सारखा सण कुटुंबाप्रमणेच सर्व समाजाने एकत्र येउन साजरा करावा अशी योजना असते. कुटुंबियांसहित एकत्र येउन दीपोत्सव , फराळ , सादरीकरण असा कार्यक्रम होतो. दिवाळी पहाट कार्यक्रमाची संकल्पना संस्कार भारतीने रुजवली आहे.

**भारत माता पूजन -** २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला जातो। मातृभूमि वरील उत्कट श्रद्धा, आदर व्यक्त करण्यासाठी कलाकारांना उद्युक्त, प्रवृत्त करणे हा उद्देश, देशभक्तीपर गीते, विचारवंतांचे मार्गदर्शन व भारत मातेचे प्रतिकात्मक पूजन असा हा कार्यक्रम असतो.

**भरतमुनी जयंती -** भरतमुनींचे कलाशास्त्रातील आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे स्मरण केले जाते. या निमित्त सर्व कलाविधांचे एकत्रिकरण होऊन भरतमुनींचे कला क्षेत्रातील समर्पण हा संस्कार भारतीच्या ध्येयवादाला अनुरूप कार्यक्रम घेतला जातो.

या व्यतिरिक्त संगीत, नाटय, नृत्य, साहित्य, चित्रकला, प्राचीनकला, भू-अलंकरण (रांगोळी) अशा कलाविधांबरोबरच मातृशक्ति विभाग, बाल विभाग, युवा विभागांचेही कार्यक्रम योजले जातात. मातृशक्ति विभागाने मंगळागौरिचे खेळ, हादगा - भोंडला या सारख्या कौटुंबिक, पारंपरिक विषयांना सामाजिक आयाम दिला व आजच्या आय टी युगातही ही परम्परा चालू ठेवली आहे.

अशा या चतुरस्त्र व्यक्तिमत्व असणारे डॉ. विष्णू श्रीधर उर्फ हरिभाऊ वाकणकर हे आमच्या वाकणकर घराण्याचे पितामह आहेत. दिनांक ४ एप्रील १९८८ रोजी ते सिंगापुर येथे आंतरराष्ट्रीय संमेलना करीता गेलेले होते. सिंगापुर येथिल पॅसिफिक हॉटेलच्या पंचवीसाव्या मजल्यावर त्यांचा मुक्काम होता. तेथुन समोरच निळ्या सागराचे विहंगम दृष्य दिसत होते. त्याचे स्केच काढीत असतानाच त्यांना मृत्यूने गाठले. शेवटच्या

श्वासापर्यंत कलेची सेवा करणारे तपस्वी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्या आड गेले.

त्यांनी आमच्या घराण्याला एका वेगळयाच उंचीवर नेले आहे. त्या घराण्याचे वारस म्हणून आम्हाला याचा सार्थ अभिमान आहे. त्यांनी अनेक छोटी मोठी कार्य केली आहेत. ते जरी गेले असले तरी त्यांनी स्थापन केलेल्या संस्था आज त्यांचे नांव अभिमानाने मिरवत आहेत. त्यातिल एक आहे वाकणकर शोध संस्थान, वाकणकर संस्कृती अन्वेक्षण न्यास. या संस्थेची स्थापना स्वत: डॉ. हरिभाऊंनी सन १९८६ मध्ये केली होती. या संस्थे तर्फे उज्जैन येथिल वराह मिहिर मार्गावर, वाकणकर म्युझियम साकार करण्यांत आले आहे. तेथे त्यांनी शोधून काढलेल्या अनेक प्रकारच्या पुरातत्वीय महत्व असणाऱ्या वस्तू संग्रहीत करण्यांत आल्या आहेत. त्यात शंकर, पार्वती, विष्णू, भैरव, कृष्ण, जैन मूर्ती जतन करून ठेवलेल्या आहेत. अश्मयुगातिल हत्यारे, पितळ, सिरॅमिक यांच्या पुरातन वस्तू, सुमारे पांच हजार प्रकारची नाणी, अनेक प्रकारची हस्तलिखिते, अशा अनेक प्रकारच्या वस्तूचे तेथे जतन केलेले आहे.




या संस्थेतर्फे सेंटर फॉर आर्ट, संशोधन केंद्र, पुरातत्वीय सर्वे, कातळचित्रे आणि कला यांचे अभ्यासकेंद्र, पुरातत्व, इतिहास आणि भारतिय संस्कृती विषयांवरील साहित्य प्रकाशित करणे, तसेच त्या विषयावर चर्चासत्र, भाषणे, कार्यशाळा आयोजित करणे या संबंधी कार्य करण्यांत येते.

अशाप्रकारे मी आमच्या कुळाचे पितामह डॉ. हरिभाऊंच्या कार्याची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. यातिल बराचसा मजकूर इंटरनेटच्या माध्यमातुन

मिळवला आहे. या शिवाय वाकणकर न्यासातर्फे वाकणकर म्युझियम उज्जैन येथे प्रदर्शित केलेल्या भित्ती चित्रावरील मजकूर, wakankar.org या संकेत स्थळावर प्रदर्शित केलेला मजकूर याच्या सहाय्याने हा लेख तयार केला आहे. त्यात अनेक प्रकारच्या त्रुटी असतिल.त्या जाणकारांनी माझ्या लक्षांत आणून द्याव्या ही विनंती आहे. या लेखाद्वारे मी डॉ हरिभाऊंना त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने आदरांजली अर्पण करीत आहे.

********

# २. श्रीवर्धनचे चितळे मास्तर

परवा पु.लं.ची चितळे मास्तर ही कथा ऐकली आणि मला आमच्या गावांतिल व्ही.सी. जोशी सरांची आठवण आली. माझी त्यांची पहिली भेट झाली तेव्हा त्यांचे वय ६५ ते ७० च्या दरम्यान होते. ते जवळच असणाऱ्या दिवेआगर येथिल हायस्कूलला इंग्रजीचे शिक्षक होते. त्यांचे लहानपण अतिशय कष्टात गेले. कोकणातिल ब्राह्मण समाजातिल बहुसंख्य कुटुंबे पूर्वी जेमतेम खाऊन पिऊन सुखी या वर्णनात बसतिल अशीच असायची. त्यामुळे मुलांना शिकवायला उचलुन पैसे देणे शक्य नसायचे. गावात जिथपर्यंत शाळा असेल तिथपर्यत शिक्षण घ्यायचे आणि थांबायचे किंवा जर पुढील शिक्षण घ्यायची दुर्दम्य इच्छा असेल तर कष्ट करायची तयारी हवी. श्रीवर्धनमध्ये पूर्वी अगदी प्राथमिक स्तरावरचे शिक्षण मिळत असे. आतासुद्धा शिक्षणाची फार चांगली सोय आहे अशातला भाग नाही. परंतु सध्या हायस्कूल मुबलक आहेत आणि हल्ली कॉलेजचीही सोय झाली आहे.

श्रीवर्धन हे तेव्हा जंजिरा संस्थानात होते. जर माध्यमिक किंवा इंग्रजी शिक्षण घ्यायचे असेल तर जंजिरा मुरुड येथे सोय

होती. सध्या दळणवळणाची साधने खूप झाली आहेत परंतु व्ही. सी. सरांच्या काळात तशी काही सोय नव्हती. श्रीवर्धन ते दिघी हे तिस किलोमिटर अंतर चालत जायचे. त्यानंतर खाडीतुन पलिकडे जाण्याकरीता तर(होडी) असायची. त्या तरीतुन खोऱ्यात जायचे खोऱ्यातुन जंजिरा मुरुडला जायला परत पैची तर असायची. त्या तरीचे भाडे एक पै होते म्हणून तिला पैची तर असे म्हटले जायचे. जर श्रीवर्धनहून किंवा मुरुडहून निघायला उशिर झाला तर बोर्ली पंचतन येथे मुक्काम करावा लागायचा. कारण पुढे जंगल होते त्यात सर्वप्रकारची श्वापदे असायची.

जंजिरा मुरुडला शिक्षणाला जाणाऱ्यांकरीता तिथे बोर्डींग असायचे. परंतु ब्राह्मण समाजाच्या मुलांना ती सोय उपलब्ध नव्हती. मुरुडला इंग्रजी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समोर दोनच पर्याय होते. एकतर नातेवाईकांकडे रहायचे किंवा वारावर शिक्षण घ्यायचे. जे पैसेवाले विद्यार्थी असायचे त्यांची सोय सहज व्हायची कारण ते पैसे मोजु शकायचे परंतु गरिबांना त्यांचे नातेवाईकही कायमचे ठेवायला तयार नसायचे. त्यात त्यांचा दोष होता असा भाग नाही परंतु त्यांची देखिल परिस्थिती त्याला कारण असे. अशा मुलांना नातेवाईकांकडे मुक्कामाला रहायच्या बदल्यात त्यांच्याकडची

पडेल ते काम करायचे आणि रहायचे हाच पर्याय स्विकारावा लागे. रोजच्या जेवणाची सोय रोज वेगळया घरी करायची. ज्याच्याकडे जेवायला जायचे त्याला सकाळी जाऊन सांगायचे आज माझा वार तुमच्याकडे आहे. त्या बदल्यात त्यांच्याकडची पूजा करायची किंवा काही काम असेल तर करायचे. सगळेच वारवाले कनवाळु असायचेच असे नाही. कोणी शिळेपाके वाढायचे किंवा कोणी उरले सुरले वाढायचे. त्यामुळे पोट भरेलच याची खात्री नाही. कधी कधी एखादा वारवाला अचानक परगावी जायचा त्यामुळे बदली कोणीतरी शोधायचा. कोणी नाहीच मिळाला तर तो दिवस उपाशीच काढायचा.

व्ही.सी सरांनी अशा प्रतिकुल परिस्थितीत आपले शिक्षण घेतले. त्यांना जरी स्वत:ला शिक्षणाकरीता कष्ट घ्यावे लागले असले तरी त्यांनी त्याचा परिणाम आपल्या अध्यापनावर पडुन दिला नाही. त्यांचे असंख्य विद्यार्थी त्यांचे नांव मोठ्या आदराने घेतात. माणसाचे मोठेपण त्याच्या अंत्यदर्शनाला कितीजण आले यावर मोजण्याची पद्धत आहे. जेव्हा व्ही.सी.सर वारले तेव्हा त्यांच्या अंत्यदर्शनाला सगळ्या स्तरांतुन त्यांचे विद्यार्थी आले होते माझ्या मते हेच त्यांचे वैभव होते.

व्ही.सी. सरांचा मी काही शाळेतला विद्यार्थी नव्हे. कारण मी जेव्हा इंग्रजी शिकायला सुरवात केली तेव्हा ते सेवानिवृत्त होऊन बरीच वर्षे जाली होती. माझ्या सारख्या अनेक गरजु विद्यार्थ्यांना त्यांनी विनामोबदला शिकवले. सेवानिवृत्त झाले होते तरी त्यांच्याकडे इंग्रजी शिकायला येणार्या विद्यार्थ्यांची गर्दी असायची. त्यांची शिकवण्याची पद्धत मोठी विलक्षण असायची. ते शाळेतल्या पुस्तकातील फार कमी शिकवायचे. त्यांचा भर तडखर्कर पाठमाला या पुस्तकांवर असायचा. त्यांची तडखर्करांची तिनही पुस्तके पाठ होती. कोणत्या पानावर कोणता शब्द आहे. कोणता काळ कुठल्या पुस्तकात किती पानावर आहे हे ते अचूक सांगत असत.

ते व्याकरण शिकवायचे ते फार मजेशिर असायचे. त्यांचा भर प्रॅक्टीकलवर जास्त असायचा. I am walking हे वाक्य ते चालुन दाखवायचे. I am crawling हे वाक्य शिकवताना ते चक्क रांगुन दाखवायचे. हाच प्रकार प्रत्येक क्रियापदाकरीता असायचा. रोज दहा शब्द पाठ करायला लावणे हे तर रोजचेच असायचे. जेव्हा ते दिलेली वाक्ये किंवा शब्द तपासत तेव्हा जर चुकले तर वही अक्षरश: फेकून द्यायचे. परंतु नंतर वह्यांच्या किमती वाढल्या आणि त्यांनी वह्या फेकून देणे सोडून दिले. त्यांच्याकडे मी तडखर्करांच्या तिनही

पाठमाला शिकलो. आज मी जे काही चार शब्द इंग्रजीमध्ये लिहू शकतोय ती त्यांचीच कृपा आहे.

त्यांच्या बद्दल एक गोष्ट आवर्जुन सांगाविशी वाटते. शिकवणीच्या वेळा सोडून जेव्हा जेव्हा मी त्यांना बघत असे तेव्हा त्यांच्या हातात झाडू असायचा. त्याचे अंगण कधीही पहा लख्ख असायचे. अंगणाच्या कुंपणीचे पान पिवळे झाले की, ते लगेचच ते काढुन टाकायचे. त्यांचे अंगण आणि रस्त्याच्या कडेच नगरपालीकेचे गटार ते नेहमी अगदी स्वच्छ ठेवायचे. जरा जरी घाण पडली तरी ते तत्परतेने उचलायचे. असा प्रकार मी हल्ली शेगावला गजानन महाराज संस्थानमध्ये पाहिला.

अशा या आमच्या व्ही. सी सरांना माझे त्रिवार वंदन.

# ३. विश्वनाथ विष्णू तथा राजाभाऊ मेहेंदळे.



माझ्या आयुष्यात अनेक व्यक्ती आल्या आणि गेल्या. काही लक्षांत राहिल्या काही विस्मरणांत गेल्या. परंतु फारच थोड्या व्यक्ती अशा आहेत ज्यांनी मनांत कायमचे घर करून ठेवले आहे. त्यातिलच एक व्यक्ती म्हणजे मेहेंदळे रावसाहेब. त्यांचे पूर्ण नांव आहे, विश्वनाथ विष्णू मेहेंदळे त्यांच्या परिचयाचे लोक त्यांना “राजाभाऊ” म्हणून ओळखत असत.

त्याचे मूळगांव गणपतीपुळयाजवळचे मालगुंड. हे गांव केशवसुतांचे गांव म्हणून प्रसिध्द आहे. सुरवातिला त्यांनी मालगुंड नजिक असणाऱ्या नांदिवडे येथे प्राथमिक शिक्षक किंवा त्याकाळातले शाळामास्तर म्हणून काम केले. त्यांनी त्याकाळात शिकवलेल्या त्यांच्या एका विद्यार्थ्याचीही माझी भेट झाली होती. त्यानंतर त्यांची पोस्टखात्यात निवड झाली. त्याकाळात पोस्ट ऑफिसमध्ये सर्वात जास्त पगार मिळत असे. असे म्हणतात त्याकाळी लोकांनी रिझर्व बँकेतली नोकरी सोडून पोस्टात नोकरी स्विकारली होती. पोस्ट ऑफिसमध्ये निवड झाल्यानंतर त्याचे ट्रेनिंग आणि सुरवातिचे पोस्टींग देखिल गुजराथमध्ये झाले होते.

माझी त्यांची पहिली भेट झाली गोरेगांवच्या पोस्टांत. मी नुकताच श्रीवर्धनहून माणगांव येथे लिव्ह रिझर्व पोस्टमन म्हणून रुजु झालो होतो. मला पहिलेच डेप्युटेशन गोरेगांवचे आले होते. त्यावेळी गोरेगांव येथे मेहेंदळे रावसाहेब पोस्टमास्तर म्हणून काम पहात होते. डेप्यूटेशनवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला तेव्हा दैनंदिन भत्ता मिळत असे. मी तेव्हा माणगांव येथे नुकतीच खोली भाड्याने घेतली होती.

त्यामुळे मी माणगांव गोरेगांव जाऊन येऊन करण्याचा विचार केला होता.

मी गोरेगांव येथे हजर झाल्यावर त्याच दिवशी त्यांनी मला खडसावले होते. तुम्ही माणगांवला राहून गोरेगावचयेथे काम करणार आहात आणि भत्ताही घेणार आहात! तेव्हा मी कोणतेही सर्टिफिकेट देणार नाही. इथे रहायचे असेल तर त्याची सोय मी करु शकतो. पहिल्याच भेटीत त्यांनी दिलेला दम ऐकून मी खूपच घाबरलो होतो. कारण तेव्हा मला नोकरी लागुन जेमतेम सहा महिने झाले होते. परंतु नंतर त्यांचा परिचय झाला आणि त्यांचा सडेतोड स्वभाव हा  त्यांचा मुखवटा आहे हे लक्षांत आले. मेहेंदळे रावसाहेब कोणालाही कधीही मदतीला तत्पर असायचे. अनेकांचे आयुष्य त्यांनी मार्गी लावले आहे.

त्यांचा माझा परिचय वाढला तो ते श्रीवर्धन पोस्टांत सब पोस्टमास्तर म्हणून हजर झाल्यानंतर. त्यावेळी माझीही बदली परत श्रीवर्धनला झाली होती. तेव्हा माझी सर्व्हीस तिन वर्षे पूर्ण झाली होती. पोस्टाच्या नियमाप्रमाणे तिन वर्षे पूर्ण झाल्यावर प्रमोशन परिक्षा देता येत असे. मात्र त्या कर्मचाऱ्याला परमानंट अथवा क्वाझी परमानंट केलेले असणे गरजेचे होते. मेहेंदळे रावसाहेब हजर झाल्यावर त्यांनी माझी क्वाझी परमानंट

केल्याची ऑर्डर काढली. त्यानंतर लगेचच दोन वर्षांनी परमानंटची ऑर्डर देखिल त्यांनीच काढली होती. जेव्हा प्रमोशन परिक्षा जाहिर झाली तेव्हा त्यांनी मला अभ्यास करण्याकरीता कामाच्या वेळेत सवलत तर दिलीच, त्याशिवाय त्यांनी मला असे सांगितले की, त्याचे जिवश्च कंठश्च असणारे पेंडसे मास्तर महाड येथे प्रमोशन परिक्षेकरीता क्लास घेत आहेत तिकडे जा.

त्या क्लासला जायचे म्हणजे महाड येथे रहाण्याची, जेवणाखाणाची सोय बघायला पाहिजे होती. याशिवाय जवळपास महिनाभर तेथे रहाण्याकरीता दामाजीपंतांची देखिल जरुरी होती. माझ्या या सगळ्या सबबी ऐकल्यावर त्यांनी माझी रहाण्याची, जेवणाची आणि पैशाची देखिल सोय केली. दुर्दैवाने मी त्यावेळी ती परिक्षा पास होऊ शकलो नाही. किंबहूना ते श्रीवर्धनला असे पर्यंत मी क्लार्क झालो नाही. परंतु या सर्व प्रसंगातुन त्यांच्यातील माणूसकीचे दर्शन झाले. एखाद्याचे आयुष्य बनावे याकरीता त्यांच्या ठाई असणारी तळमळ दिसुन येत होती.

ते सेवानिवृत्त झाल्यानंतर बरेच वर्ष श्रीवर्धन येथेच रहात होते त्यामुळे त्यांच्याशी सतत संपर्क होता. ते नारायण

पाखाडीत दादा टेमकर यांच्या घरात रहात होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर श्रीवर्धन येथे हळबे रावसाहेब पोस्टमास्तर म्हणून आले होते. त्यांना श्री शिवमहिम्न शिकायचे होते, माझेही अर्धे झालेले होते. तेव्हा आम्ही दोघे आणि आमच्या जोडीला मेहेंदळे साहेब देखिल मोरुतात्या उपाध्ये यांच्यकडे महिम्न शिकायला जायचो. तेव्हा दररोज संध्याकाळी आधी मेहेंदळे साहेबांकडे बैठक असायची त्यानंतर महिम्न. ते टेमकरांच्या घरांत रहात असताना अधिक महिना आला होतो. तेव्हा आम्ही (म्हणजे मी, माझी सौ., मेहेंदळे साहेब, मेहेंदळे बाई आणि सौ. गंद्रे) त्यांच्या घरी दासबोधाचे पारायण केले होते.

कालांतराने मेहेंदळे बाई देखिल सेवानिवृत्त झाल्या आणि त्यांनी आपला मुक्काम लोणेऱ्याला स्वत:च्या घरात हलवला. मी देखिल प्रमोशन होऊन दिवेआगर, वाळवटी आणि श्रीवर्धन येथे क्लार्क अथवा सबपोस्टमास्तर म्हणून काम केले होते. त्यानंतर मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने मी माझी बदली गोरेगांव येथे करून घेतली. तेव्हा परत आमचा मेहेंदळे साहेबांशी संपर्क झाला. त्यावेळी आम्ही मॉर्निंग वॉकला लोणेऱ्या पर्यंत जात असू. तेव्हा जाता येता कधीतरी त्यांची गाठ

पडत असे. विशेष म्हणजे गोरेगांव येथे आम्ही आमचे बिऱ्हाड मेहेंदळे साहेब पूर्वी जेथे रहात असत त्या बबन मोने यांच्या घरांतच केले होते. मेहेंदळे साहेब जवळपास दररोजच गोरेगांव येथे येत असत त्यामुळे त्यांची रोजच भेट होत असे.

केदारला लोणेरे येथिल बाटु मध्ये डिप्लोमा करीता प्रवेश घेतला होता. त्याचा डिप्लोमा पुरा झाल्यावर त्याचे कँपस इंटरव्ह्यू मध्ये सिलेक्शन झाले होते. ही गोष्ट मेहेंदळे साहेबांना समजली तेव्हा ते ताबडतोब माझ्या घरी आले आणि केदारला नोकरी न करता डिग्री पूर्ण कर असे निक्षुन सांगितले. त्यावर आम्ही गोलमाल बोलल्यावर, त्यांनी पैशाची अडचण आहे कां असे स्पष्ट विचारले. तेव्हा पैशाचा प्रश्न नाही आणि जरुर वाटली तर बँकेतुन लोन घेता येईल असे म्हटले. त्यानंतर त्यांनी त्यांचा मुलगा विनय याच्याशी बातचित करून एक प्रस्ताव माझे समोर ठेवला होता. त्यांनी मला केदारच्या डिग्री करीता लागणारे पैसे बँकेतुन न घेता ते देणार आहेत असे बजावले. त्यांनी विनयला असेही सांगितले होते की, मी जरी नसलो तरी केदारचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत लागणारी रक्कम तो देईल. सुदैवाने मला त्यांच्याकडून पैसे घेण्याची वेळ आली नाही. परंतु त्यांनी ते असोत अथवा नसोत केदारच्या शिक्षणाकरीता लागणाऱ्या

पैशाची तरतूद केली होती. ही गोष्ट त्यांचा मनाचा मोठेपणा आणि परोपकारी वृत्ती दाखवत होती.  अशाच प्रकारे त्यांनी अनेकांना मदत केली होती.

पुढे त्यांची पंचाहत्तरी गोरेगांव येथे आयोजित केली होती. त्या कार्यक्रमाला मी उपस्थित होतो. त्यावेळी त्यांनी त्यांना अती प्रिय असणारा तंबाखु सोडला होता. त्याचप्रमाणे यापुढे अंगाला सोने लावणार नाही हा देखिल निर्धार त्यांनी केला होता. लोणेऱ्याला असताना मी अनेकदा पोस्टाच्या कामासंदर्भात त्यांचा सल्ला घ्यायला जात असे. गोरेगांवहून नंतर माझी बदली दासगांव येथे पोस्टमास्तर म्हणून झाली. ती बदली मी केवळ गोरेगांव येथुन जाऊन येउन करता येईल म्हणून मी स्विकारली होती. मला साहेब तिथे जाण्यापेक्षा दुसरे सेफ ऑफिस देतो म्हणून सांगत होते. त्याला कारण असे होते, दासगांवला पैशांची अफरातफर झालेली होती. त्यामुळे तेथे अगदी डोळ्यांत तेल घालुन काम करणे आवश्यक होते. त्यावेळी मला मेहेंदळे साहेबांची खूपच मदत झाली. त्यावेळी मी दररोज लोणेरे येथे त्यांच्याकडे थांबुन दासगांव येथे दिवसभरांत झालेल्या सर्व घटनांबाबत मी त्यांच्याशी चर्चा

करून त्याचा सल्ला घेऊन काम करीत असे. त्यांच्या बहुमोल सल्ल्यामुळे मी दासगांवचे शिवधनुष्य पेलू शकलो.

या ठिकाणी त्यांची एक आठवण आवर्जुन सांगाविशी वाटते. ते नियम आणि व्यवहार यांची सांगड घालुन काम करीत असत. ते श्रीवर्धन येथे कार्यरत असताना एका गावांत जवळपास साठ सत्तर आर्.डी. खात्यांची मुदत संपल्याने त्या लोकांना एका दिवशी रक्कम अदा करायची होती. त्या सर्व खातेदारांनी श्रीवर्धन येथे येण्याकरीताचा वेळ आणि पैसे खर्च करून येण्याऐवजी त्यांना त्यांच्या गावात जाऊन रक्कम वाटप करण्याची योजना श्री मेहेंदळे साहेब यांनी केली होती. त्याकरीता आवश्यक असणाऱ्या तरतुदी त्यांनी केल्या आणि त्या खातेदारांना सर्व रक्कम त्यांच्या गावांत जाऊन अदा केली होती. या मध्ये कोणाचेही नुकसान नव्हते की फायदा. परंतु ही गोष्ट नियमाविरुध्द होती. या गोष्टीचा लेखी रिपोर्ट आमच्याचपैकी एकाने साहेबांना केला होता. या व्यवहारांत खातेदारांची सोय झाली परंतु मधल्या मधे मेहेंदळे साहेबांना खात्यामार्फत चौकशीला सामोरे जावे लागले त्यातुन त्यांना किरकोळ शिक्षा देखिल झाली होती.

श्रीवर्धन पोस्टांत सन १९८० पासुन सत्यनारायणाची पूजा आयोजित केली जाते. हा कार्यक्रम ऑफिस स्टाफ आणि त्यांचे कुटूंबीय मिळून साजरा करतात. मेहेंदळे साहेब श्रीवर्धनला येण्यापूर्वी हा कार्यक्रम अगदी साध्या स्वरुपात साजरा केला जात असे. मेहेंदळे साहेब पोस्टमास्तर म्हणून हजर झाल्यावर पहिल्याच वर्षी सत्यनारायणाची पूजा साजरी करण्याचा विषय आला होता. त्यावेळी त्यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे सर्वांना सांगितले, हा कार्यक्रम जर बंद करायचा असेल तर तुम्ही तसे करु शकता त्याकरीता मी परवानगी देत नाही असे जाहिर केले तरी चालेल. परंतु जर चालू ठेवायची असेल तर ती परत बंद करून चालणार नाही. परंतु सर्वांनी ही परंपरा चालू ठेवायचीच असे सांगितले. त्यानंतर मात्र हा पूजेचा कार्यक्रम हा एक सोहळाच व्हायला लागला. परंपरेप्रमाणे आदल्या रात्री सर्व ऑफिस धुण्यापासुन पूजेच्या दिवशी रात्री भजनाची बारी होई पर्यंत सर्व स्टाफ मनापासुन भाग घेत असे. अशाप्रकारचे कार्यक्रम साजरा करण्याकरीता मॉनेटरची भूमिका महत्वाची असते. ती भूमिका मेहेंदळे साहेब तन, मन, धन खर्च करून निभावायचे. त्यावेळी त्यांचा उत्साह एवढा असायचा की, जेवण तयार करण्याकरीता इंधन जमा करण्यापासुन ते

भाजी, आमटी फोडणीला टाकेपर्यंत त्यांचा सहभाग असे. त्यांचा तो उत्साह पाहून सर्वांचाच उत्साह वाढत असे.

अशा या जगमित्र असणाऱ्या मेहेंदळे साहेबांचे निधन झाल्याचा फोन त्यांची मुलगी वीणा हीने केला होता. त्यानंतर त्यांच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांना श्रध्दांजली वहावी असे ठरवले होते. हे लेखन ही त्यांना वाहिलेली माझी श्रध्दांजलीच आहे. ते माणूस म्हणून किती मोठे होते याचा अनुभव त्यांचा सहवास लाभलेलेच जाणतात. मालगुंड येथिल नारळाप्रमाणेच ते वरून कठोर आणि अंतर्यामी मधाळ, स्निग्ध असे होते. त्यांना माझी ही आदरांजली!

# ४. हकिमबाबा

परवा सहज सायकलवर चक्कर मारायला बाहेर पडलो होतो. तेव्हा बुडन पाखाडी, सराई मोहल्ला, चौकर पाखाडी असा फिरत फिरत समुद्रावर गेलो होतो. त्यावेळी सराई मोहल्यातुन जाताना हकिमबाबांचा दवाखाना आणि दुकानाची जागा नजरेस पडली आणि जुन्या आठवणी जाग्या झाल्या. आपल्याला आयुष्यात अनेक प्रकारची माणसे भेटतात. प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वेगळे असते. काहीजण आपल्या ह्रदयांत कायमची घर करून बसतात. हकिमबाबा हे एक त्यातलेच व्यक्तिमत्व आहे. त्यांना विसरावे म्हटले तरी विसरता येणार नाही.

मी पोस्टमन म्हणून काम करताना त्यांना अनेक वेळा भेटलो. सुरवातिल पत्र टाकण्यापुरता संबंध होता. नंतर नंतर ओळख वाढत गेली. सराई मोहल्याच्या नाक्यावर त्यांचे दुकान आणि दवाखाना होता. त्याकाळात पोस्टाने पत्रव्यवहार जास्त होत असत. त्यामुळे त्यांच्या दुकानात पोस्टकार्ड, अंतर्देशिय पत्र, पाकिटे, मनी ऑर्डर फॉर्म विक्रिला ठेवलेले असत. मी जेव्हा पत्र वाटायला त्यांच्याकडे जात असे तेव्हा ते पोस्टातुन पोस्टाची स्टेशनरी(कार्ड, पाकिटे वगैरे) आणायला सांगत

असत. कधी कधी अचानक आमची बीट बदलली जायची मग त्यांनी दिलेल्या पैश्यांची स्टेशनरी घेतली तरी लगेचच पोचवली जायची नाही. तरीही त्यांनी कधीही अविश्वास दाखवला नाही. या व्यवहारातुन त्यांची ओळख वाढत गेली. सुरवातिला ते डॉक्टर आहेत हेच मला माहित नव्हते.

हकिमबाबा ही अतिशय धार्मिक व्यक्ती होती. तिन वेळचा त्यांचा नमाज कधी चुकला नाही. ते नियमितपणाने जशी अजमेर शरिफ येथे मनी ऑर्डर करायचे तशीच तुळजापुरला अथवा गाणगापुरला देखिल करायचे ते म्हणायचे मी कबीर पंथी आहे. त्यांनी नाशिक येथिल आयुर्वेद सेवा संघामध्ये आयुर्वेदाचे शिक्षण घेतले तर युनानी हकीमीचे शिक्षण उत्तर प्रदेशांत घेतले होते. एकुण जवळपास बारा वर्षे त्यांनी आयुर्वेद आणि युनानीचे शिक्षण घेतले होते.

त्यांच्याकडे शारंगधर संहितेची मूळ संस्कृत पोथी होती. त्यामध्ये निरनिराळया प्रकारचे काढे, भस्मे, रसायने, प्राश बनवायचे फॉर्म्युले होते. पूर्वी हकिमबाबा अनेक प्रकारची औषधे स्वत: बनवत असत. परंतु बाजारात तयार आयुर्वेदिक औषधे मिळायला लागल्यापासून त्यांनी औषधे बनवणे सोडले होते. नाशिकच्या दाते वैद्यांच्या आठवणी ते नेहमी सांगत

असत. माझे एक चुलत चुलत आजोबा कै. धोंडो वाकणकर हे देखिल वैद्य होते. त्यांच्या आठवणी देखिल ते सांगत असत.

त्यांच्याकडे अनेक प्रकारचे काढे, आसवे, च्यवनप्राश सारखे प्राश, निरनिराळ्या मात्रा उपलब्ध असत. त्यांच्याकडे दुपारी खेडेगावातल्या रुग्णांची गर्दी होत असे. त्या रुग्णांवर ते अतिशय अल्पदरात उपचार करित असत. जुन्या दिर्घकाल असणाऱ्या रोगांवर ते खात्रीने उपचार करीत असत. मी देखिल अनेक वेळा किरकोळ किरकोळ रोगांवर त्यांच्याकडून उपचार घेत असे. आपल्या घरांत सहज उपलब्ध असणाऱ्या वस्तुंचा औषधी उपयोग ते सांगत असत. मला नेहमी तोड येण्याचा म्हणजेच छाले पडण्याचा त्रास होता. त्यावर त्यांनी त्याकाळी प्रत्येक घरी सहज उपलब्ध असणारे मायफळ उगाळुन लावायला सांगितले होते. त्याने मला ताबडतोब आराम पडत असे. त्यांनी सांगितलेला हा उपचार मी एका एम्. बी. बी. एस्. झालेल्या डॉक्टरांना देखिल सांगितला होता. विशेष म्हणजे त्या डॉक्टरांना त्या उपचाराचा लगेचच प्रत्यय देखिल आला होता.

हकिमबाबा जसे शरिरावरच्या रोगावर उपचार करित असत तसेच ते मानसिक रोगावर देखिल त्यांच्या पध्दतीने उपचार करीत असत. लोकांना हकिमबाबांना जादू टोणा

करतात असे वाटायचे परंतु तो त्यांचा मानमिक उपचार असे. याबाबत मी त्यांच्याशी एकदा बोललो होतो. त्यावर त्यांनी सांगितले होते, ज्या रोग्याच्या मनात माझ्यावर करणी केली आहे, मला कुठलीतरी भूतबाधा झाली आहे असे ठाम बसले आहे. तो रोगी शरिरावर केलेल्या कोणत्याही  उपचाराने बरा होणार नाही. त्याला उपचार देखिल मानसिकच हवा. म्हणून ते त्या मानसिक रोगी असलेल्या रोग्याला उतारा वगैरे काढायला सांगत असत. त्यांच्या या उपचाराने आणि जोडीला आयुर्वेदिक औषधाने तो रोगी खडखडीत बरा होत असे.

या बाबतित मला माझ्या आतेभावाची गोष्ट आठवते तो प्राथमिक शिक्षक होता. या शिवाय खेडेगावांत पौराहित्यही करीत असे. त्याच्यावर अनेकांचा विश्वास होता. गुरुजींनी काही तोडगा सांगितला तर नक्की परिणाम होईल असा त्याच्या विषयी लोकांचा समज होता. एकदा मी त्याच्याकडे गेलो होतो. तेव्हा दोघीजणी सासवा सूना आल्या होत्या. त्या सासुचा  प्रश्न होता मुलाचे लग्न होऊन दोन वर्षे झाली तरी मुलबाळ काही नाही काहितरी तोडगा सांगा. त्यावर माझ्या भावाने त्यांना एका विड्याच्या पानावर हळदकुंकू, वगैरे साहित्य ठेवुन ठरावीक

दिवशी तिन्हीसांजा ते पान मुलाने आणि सुनेने चव्हाट्यावर ठेवावे असे सांगितले.

त्या दोघीजणी निघुन गेल्यावर मी त्याला हे काय असे विचारले त्यावर त्याने सांगितले, अरे अनिल! या बाईचा मुलगा मुंबईत, आणि सून इथे गांवाला तेव्हा त्यांचे पोटपाणी पिकेलच कसे. परंतु मी जर असे सरळ सांगितले तर त्या बाईला पटणार नाही. परंतु आता मी सांगितलेला तोडगा पुरा करायला ती मुलाला गावाला बोलवेल त्यानंतर सुनेला आणि मुलाला तो तोडगा पुरा करायसाठी एकत्र यावे लागेल हा असा माझा उपचार आहे. हकिमबाबा तरी काय वेगळे वागत होते. जसा रुग्ण तसा उपचार हे त्यांचे धोरण होते.

असे हे हकिमबाबा माझ्या कायम स्मरणात राहिलेले आहेत. माझ्या मनाचा एक कोपरा त्यांनी व्यापला आहे. पोस्टमन मधून प्रमोशन झाल्यानंतर माझे श्रीवर्धन सुटले, त्यांचा संपर्कही तुटला. कधीतरी ते पैगंबरवासी झाल्याचे समजले. त्यांच्या दुकानावरून जाताना हे सर्व आठवले. त्यांचे आता दुकान चालू दिसले परंतु दवाखाना मात्र बंद दिसला. त्यांच्या कडील शारंगधर संहितेतिल अनेक फॉर्म्युले मी लिहून घेतले होते. त्या वह्या कोणालातरी वाचायला दिल्या त्या त्याने परत

केल्याच नाहित. त्यामुळे ती देखिल त्यांची आठवण आता शिल्लक नाही. त्यातल्या फॉर्म्युल्यावरून मी आडुळशाचा काढा केला होता तो जवळपास दोन वर्षे आम्ही वापरत होतो.

अशा या हकिमबाबांना माझी ही आदरांजली.

# ५. जयंत जयराम उर्फ बंधू केमनाईक



मला भेटलेल्या आणि भावलेल्या व्यक्तीमत्वांचे चित्रण करायचा मी प्रयत्न करीत आहे. आज मी अशा एका व्यक्तीची माहिती सांगणार आहे, जिने आयुष्यभर कष्टच केले आणि जबाबदाऱ्यांचे ओझे वागविले. ते आहेत माझे क्लार्कच्या नोकरीतले पहिले गुरु. त्याचे नांव आहे, ‘‘जयंत जयराम केमनाईक’’. त्यांना संबोधन मात्र बंधू असे आहे. बंधू म्हणजे अर्थातच मोठा भाऊ. मोठ्याभावाला नेहमी कर्तव्यच करायचे असते. आपल्या लहान भावंडांची काळजी घेणे त्यांच्या अडीनडीला धाऊन जाणे हिच भूमिका त्यांनी कायम

निभावली. त्याकरीता ती भावंडे रक्ताचीच असायची जरुरी नाही. त्यांना बंधू म्हणून मानणारी सर्वच त्यांची भावंडे होती.

त्यांचे आतापर्यंतचे सर्व आयुष्य जबाबदाऱ्या सांभाळण्यातच गेले. आता कोठे चार सुखाचे समाधानाचे दिवस आले तेव्हा त्यांच्या प्रकृतीने दगा दिला आहे. त्यांनी आपले तन आणि मन पोस्टाच्या सेवेला वाहिलेले होते. त्यांच्या नोकरीची सुरवात बॉय मेसेंजर या पदाने झाली. त्याकाळात आलेल्या तारा(Telegrams) वाटपा करीता १६ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांची नेमणूक करीत असत. वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर ते रेग्युलर पोस्टमन म्हणून काम करु लागले. त्याकाळात पोस्टात कामावर जाण्याकरीता परिक्षा वगैरे द्याव्या लागत नसत. कारण तेव्हा पोस्टात कामाला माणसेच मिळत नसत. आपल्या ओळखितील लोकांना पोस्टात चिकटवत असत. त्याचे शिक्षण कौटुंबीक परिस्थिती मुळे कमी झाले होते. त्यामुळे त्यांना इंग्रजीचा बाऊ वाटत असे. पोस्टाच्या नियमाची सर्व पुस्तके त्या काळांत इंग्रजीतच असत.

पोस्टमनच्या नोकरी पुरेशी झाल्यावर त्यांनी मेल ओव्हरसिअरचे काम स्विकारले. हे काम म्हणजे मोठ्या जबाबदारीचे काम होते. शाखा डाकघरांची नियमित तपासणी

करणे ही मुख्य जबाबदारी मेल ओव्हरसिअरची असायची. जर एखाद्या शाखा डाकपालाने काही गफला केला तर त्याची पहिली जबाबदारी मेल ओव्हरसिअरवर थोपवली जायची.

त्याकाळात सर्व पत्रव्यवहार पोस्टानेच होई. कोणी जन्माला आले किंवा कोणी मरण पावले तर ती बातमी पत्रानेच समजायची. त्यामुळे पत्रांच्या वितरणावर पोस्ट खात्याची बारीक नजर असायची. एक आण्याला मिळणारे पोस्टकार्ड जर नियत काळापेक्षा उशिरा वितरीत झाल्याचे सिध्द झाले तर त्याला जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्याला तात्काळ कामावरून निलंबित करण्यात येत असे. अशा प्रकारची कार्यवाही करण्याचे अधिकार तेव्हा ओव्हरसिअरला देखिल असत.

शाखा डाकपालांचे दैनंदिन हिशेब तपासणे, पोस्टाच्या बचत खात्यांच्या खातेदारांना त्यांच्या घरी जाऊन भेटून त्यांच्या पासबुकांची तपासणी करणे आणि त्यात काही गफलत असेल तर तसा रिपोर्ट करून योग्य ती कार्यवाही करणे, खेडोपाडी जाऊन तेथिल लेटर बॉक्स वेळेवर उघडले जातात का नाही ते तपासणे, शाखा डाकघरांतुन वितरणाला जाणाऱा कर्मचारी नियमितपणे खेडेगावांना भेट देतो की नाही हे तपासणे

अशी अनेक जबाबदारीची कामे ओव्हरसिअरला करावी लागत असत. त्याच्या पोस्टचे नांव ओव्हरसिअर असले तरी तो वठवित असलेली भूमिका इन्स्पेक्टरचीच असायची. फार तर सब इन्स्पेक्टर म्हणूया. हे जबाबदारीचे काम बंधूंनी समर्थपणाने पेलले. या कामामध्ये रोजचा प्रवास, रोज नवे नांव, रोज वेगळे पाणी, वेगळे जेवण यामुळे प्रकृतीला हे त्रासदायक असायचे. याशिवाय दररोजचे टेन्शन एखादा गफला झाला आणि तो नजरेआड झाला तर पहिली कारवाई ओव्हरसिअरवर व्हायची.

मेल ओव्हरसिरची नोकरी बरेच दिवस केल्यावर त्यांनी क्लार्कची परिक्षा देण्याच्या दृष्टीने तयारी सुरु केली. परंतु घोडे इंग्रजीशी अडू लागले तेव्हा त्यांनी श्रीवर्धनचे चितळे मास्तर व्ही. सी. जोशी सरांकडे इंग्रजी शिकणे सुरु केले. त्यांना या कामात माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळी श्रीवर्धन येथे असणारे पोस्टमास्तर वैद्य आणि कोल्हटकर यांनी मदत केली. आणि त्यांना क्लार्कची परिक्षा देण्यास मनाने आणि अभ्यासाने तयार केले. यामधील वैद्यमास्तर हे श्रीवर्धन येथील पेशवे आळीतिलच होते. बंधू सांगायचे त्याप्रमाणे एखाद्या वकिलाला जसे सर्व कायदे मुखोद्गत असावेत तसे वैद्य मास्तरांचे पोस्टाचे

नियम कोणत्या पुस्तकांत कोणत्या पानावर आहेत हे तोंड पाठ होते. अशा माणसाचे बंधूंना पाठबळ होते म्हटल्यावर बंधू क्लार्कच्या परिक्षेचे शिवधनुष्य पेलणार नाहीत असे होणारच नाही. अर्थातच बंधू पोस्टल क्लार्क झाले.

काही वर्षे क्लार्कचे काम केल्यानंतर त्यांची बदली बोर्लीपंचतन येथे झाली. तेथे त्यांना भिसे साहेब पोस्टमास्तर होते. भिसेमास्तर शिस्तप्रिय आणि सर्व नियमांची जाण असणारे होते. बंधूदेखिल त्याच प्रवृत्तीचे होते त्यामुळे त्यांचे तेथे छान मेतकूट जुळले. नियमांच्या बारकाव्या वरून त्यांचे आणि भिसे साहेबांचे कधी वाद होत असत. परंतु त्यातुन त्या नियमांचे नव्याने ज्ञान होत असे. तेथे अनेकवेळा सिंगल हँडेड पोस्टमास्तर म्हणून स्वतंत्रपणाने काम करण्याचा अनुभव बंधूंना मिळाला, अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

त्यानंतर त्यांनी अनेक वर्षे सिंगल हँडेड पोस्टमास्तर म्हणून काम केले. त्यात बागमांडला हे त्यांचे अशाप्रकारचे पहिले ऑफिस. येथे त्यांचा स्वतंत्र संसार सुरु झाला. सुरवातिला गाडग्या मडक्यांच्या सहाय्याने सुरु केलेला संसार पुढे भरभराटीला आला. तिथपर्यंत माझा आणि त्यांचा परिचय नव्हता. मी पोस्टांत नोकरीला लागेपर्यंत पोस्टाशी देखिल संबध

नव्हता. मी जेव्हा पोस्टमन म्हणून श्रीवर्धन येथे हजर झालो तेव्हा बंधूंचा मला अभिनंदनाचा फोन आला होता. ही त्यांची आणि माझी पहिली अप्रत्यक्ष भेट. त्यानंतर त्यांची बदली श्रीवर्धन येथे झाली तेव्हा त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. त्यानंतर परिचय वाढत गेला. दरम्यान त्यांची दिवेआगर, म्हसळा येथे बदली झालेली होती. त्यानंतर मी जेव्हा क्लार्कची परिक्षा पास झालो तेव्हा माझे पहिले पोस्टींग दिवेआगर येथे झाले होते. त्यावेळी बंधू तिथे पोस्टमास्तर म्हणून काम पहात होते.

दिवेआगरयेथे माझी प्रमोशनवर बदली झाली परंतु आर्थिक परिस्थिती खालावली कारण श्रीवर्धन येथे स्वत:च्या घरात रहात होतो. पोस्टमन म्हणून कपडे, जोडे, छत्री सर्व सरकारी मिळत असे. येथे त्याच्या उलट होते. पगार वाढला पस्तिस रुपये आणि खर्च वाढला दोनशे रुपये. कारण घरभाडे आणि इतर खर्च वाढला होता. तेव्हा मला बंधूनी खूप धीर दिला कारण तेही या परिस्थितीतुन गेले होते. त्यांनी दिवेआगर मध्ये अनेक माणसे जोडली होती, लोकाचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. बंधूंनी त्यांच्या परिचयाचे आणि अगदी कुटूंबातिल एकच असल्यासारखे असणारे बाळ करमरकर उर्फ भाऊ यांच्याकडे मला रहायला जागा मिळवुन दिली. ते घर

पोस्टाच्या अगदी जवळ होते. त्यानंतर करमरकर कुटूंबाचा परिचय खूप वाढला आणि आम्ही त्यांच्या कुटूंबातलेच एक झालो.

केमनाईक, वाकणकर आणि करमरकर यांचे जणू एक कुटूंबच तेथे स्थापित झाले होते. तेथे आम्ही प्रथम जिलेबी तयार करायचा प्रयत्न केला होता. त्यानंतर अनेक वेळा आम्ही हा प्रयोग केला होता. इतके की, तेथिल दुकानदार प्रकाश दातार त्यांच्या दुकानात गेल्यावर  आम्हाला बरेच दिवसात जिलेबी झाली नाही कां? असे विचारायला लागले होते. आमच्या तिन कुटूंबाचा अनेकवेळी एकत्र जेवणाचा कार्यक्रम होई. त्याला कोणतेच कारण लागत नसे. आले मनांत की लगेचच अमलात आणले जाई.

बंधूच्याकडे मी पोस्टाच्या कामा संदर्भात अनेक गोष्टी शिकलो. पोस्टाचे “अहर्निशं सेवा महे” हे ब्रीदवाक्य ते अक्षरश: जगत होते. वास्तविक दिवेआगर पोस्टाची वेळ सात वाजता सुरु होई, परंतु ते सकाळी साडेसहालाच तयार होऊन कामावर हजर झालेले असत. त्याला कारण होते तेथिल शाखा डाकघरांचे टपाल घेऊन जाणारी गाडी सकाळी साडे सहाला दिवेआगर गावात जायची आणि सात वाजता परत फिरून

घेऊन जायची. या दिवेआगर गावात जाऊन परत येण्याच्या काळात बंधू शाखा डाकघराकडून आलेला हिशेब तपासुन त्यात काही गफलत असेल तर परत जाणाऱ्या टपालाबरोबर तसा निरोप द्यायचे.

पोस्ट खात्यात दर तिन वर्षांनी रिव्हीजन केस तयार करण्यांत येते. या रिव्हिजन केसचे महत्व स्टाफच्या दृष्टीने आणि जनतेच्या दृष्टीन देखिल खूप असते. कारण या रिव्हिजन केस मधूनच त्या त्या पोस्टामधील स्टाफची संख्या ठरत असते. असलेला स्टाफ टिकवणे देखिल फार जिकिरीचे असते. कर्मचारी करत असलेल्या प्रत्येक कामाकरीता एक टाईम फॅक्टर असतो. तो अगदी सेकंदात मोजला जातो. त्यामुळे अगदी डोळयांत तेल घालुन रिव्हीजन केस बनवावी लागते. ती बनविण्या करीता आवश्वक असणाऱ्या खुब्या बंधूनी मला दिवेआगर येथे त्यांच्या हाताखाली काम करीत असताना शिकवल्या.

पोस्टामध्ये बऱ्याच वेळा स्टाफ कमी आणि काम जास्त अशी परिस्थिती असते. त्याला कारण ही रिव्हीजन केस योग्य दक्षता न घेता बनविली जाणे हे होऊ शकते. अनेक वेळा टाईम फॅक्टर प्रमाणे पूर्ण वेळ कर्मचारी बसत नसतो. तेव्हा असलेल्या

कर्मचाऱ्यांनाचे ते जास्तिचे काम करावे लागते. अशा वेळी अशी कामे जास्तवेळ बसुन करावी लागतात. कधी कधी त्याकामाकरीता नियमात बसत असेल तर ओव्हरटाईम भत्ता मंजूर केला जातो. तो देखिल खूपच अल्प असतो. परंतु त्याला देखिल टाईम फॅक्टर मध्ये बसवुन मंजूर करावा लागतो. ती सुध्दा एक  कसरत असे. या दोन गोष्टी बंधूनी मला उत्तम पध्दतीने शिकवल्या होत्या. त्यामुळे मी नंतर श्रीवर्धन, गोरेगांव, दासगांव आणि पाली या ऑफिसच्या देखिल रिव्हीजन केसेसे बनवल्या होत्या. त्या मी तयार करु शकलो याला बंधूंचे योग्य मार्गदर्शन हे एकमेव कारण होते.

अशाच प्रकारे पोस्टात एक किचकट काम असते ते म्हणजे, मयत माणसाच्या वारसांना मयताच्या नावावर असलेली रक्कम अदा करणे. यात दोन प्रकार असतात. वारस नेमलेला असेल तर आणि नसेल तर वेगळया पध्दतीने ही कागदपत्रे तयार करावी लागायची. आमच्यामधले अनेकजण अशा केसेस टाळायच्या किंवा टोलवायचा प्रयत्न करायचे. परंतु नियमांची योग्य जाण आणि व्यवहार यांचा समतोल साधून अशा प्रकारच्या केसेस कशा हाताळायच्या यांचे प्रात्यक्षिक बंधूंनी माझ्याकडून करवुन घेतले. त्यामुळे भविष्यात मला

अशा केसेस करताना अडचण आली नाही. विशेषत: मी जेव्हा दासगांवला बदलुन गेलो तेव्हा तेथे दरड कोसळण्याची घटना नुकतीच घडली होती. तेथे प्राथमिक शाळेतिल मुलांची १५-२० खाती अशा पध्दतीने बंद करायची होती. त्या प्रत्येक खात्यात अगदी किरकोळ रक्कम जमा होती. परंतु त्या केसेस सहा सात महिने नुसत्याच टोलवल्या जात होत्या. माझ्या दिवेआगर येथील अनुभवाच्या जोरावर मी त्या अगदी कमी कालावधित पूर्ण केल्या होत्या.

बंधूच्याकडे तेव्हा अनेक प्रकारच्या पोस्टाच्या दैनंदिन व्यवहारात न लागणाऱ्या फॉर्मस् चा खजिना होता. त्यामध्ये डुप्लिकेट पासबुक, डुप्लिकेट बचतपत्र मिळवण्याचा अर्जाचा फॉर्म, वारस नेमणे, बदलणे या सारखे क्वचित लागणारे फॉर्म असायचे. अशा प्रकारचे जवळपास शंभर प्रकारचे तरी फॉर्म त्यांच्या जवळ होते. ते फॉर्मस त्यांनी नंतर माझ्या ताब्यात दिले होते. त्या अर्थाने मी बंधूचा पोस्ट ऑफिसमधील वारस होतो. पुढे पालीला बदलुन गेल्यावर मी त्याचे एक पी.डी.एफ्. मध्ये हँडबुक तयार केले व ते सर्व पोस्टाच्या स्टाफला विनामूल्य उपलब्ध करून दिले होते. या शिवाय याची सॉफ्ट कॉपी आजही नेटवर उपलब्ध आहे.

बंधूंच्या मार्गदर्शनाखाली मी पोस्टातील नियमांचे आणि निरनिराळया तक्त्यांचे माझ्या उपयोगाकरीता एक डायरी तयार केली होती. ती नंतर मी सार्वजनिक केली. त्या डायरीत पोस्टाच्या काऊंटरवर काम करताना किंवा सिंगल हँडेड पोस्टमास्तर म्हणून काम करताना चांगला उपयोग होत असे. त्याचे देखिल मी पोस्टल हँडबुक हे पुस्तक तयार केले. हे पुस्तक देखिल तेव्हा मी सर्वांना मोफत उपलब्ध करून दिले होते. त्याची देखिल सॉफ्टकॉपी नेटवर उपलब्ध आहे.  त्या पाठिमागची मूळ कल्पना बंधूंचीच होती. अशा प्रकारे बंधूची छाया माझ्या पौष्टीक(पोस्टातील कामकाजात) जीवनावर पडलेली आहे.

दिवेआगर आणि बागमांडला हे त्यांचे घरच होते. त्यांच्यावर डोळे मिटून विश्वास ठेवणारे या दोन्ही गावांत असंख्य लोक होते. त्याला कारण ते नेहमीच मोठ्या भावाच्या भूमिकेत असत. छोट्या पोस्टांत कॅश मॅनेजमेंट हा मोठा जिकिरीचा विषय असायचा. परंतु बंधूच्या लोकांशी असलेल्या घरगुती संबंधामुळे ते तो सहज सोडवायचे. त्याकाळात पोस्टामध्ये टारगेट हा विषय नसायचा, परंतु जेव्हा ग्रामिण डाक जिवन विमा हा नवीन सेवेचा प्रकार सुरु झाला तेव्हा त्याचे

टारगेट देणे सुरु झाले. तेव्हा बंधूच्या मोठ्या भावाच्या भूमिकेची खूपच मदत झाली. आम्हाला तेव्हा कोणाच्याही घरी न जाता आमचे टारगेट पूर्ण करता यायचे. ते पोस्टाच्या बाहेरच्या बाकावर बसायचे तेव्हा तिथे अनेक जण यायचे त्यांची चौकशी करता करता ते उत्पन्न किती खर्च किती असे एखाद्याला सहज विचारायचे. त्यातुन शिल्ल्क रहाणारी रक्कम किती याचा हिशेब करून त्याला पोस्टात खाते काढुन त्याला बचतीची सवय लावायचे. असे तेथे अनेकजण होते.

अशा या माझ्या वडिल बंधूंना आणि पोस्टातिल गुरुंना माझा मानाचा मुजरा. त्यांना निरामय दिर्घायुष्य लाभो ही परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# ६. मोहाचा नारळ



*काका! मोठ्या काळजीतुन मुक्त झालो! आत्ताच आपल्या परसातला माड आडवा करून घेतला! आता आज रात्री पासुन मी निवांत झोपू शकेन!* परवा माझ्या पुतण्याचा मला व्हॉटस् अँपवर मेसेज आला.

दोन जूनला टी.व्ही.वरून हवामान खात्यातर्फे जाहिर करण्यांत आले की, निसर्ग नांवाचे चक्रीवादळ तयार होत आहे आणि ते रायगड जिल्हयातील हरिहरेश्वर येथे दिनांक ३ जून रोजी दुपारी तीनच्या दरम्याने धडकेल. वाऱ्याचा वेग ताशी १०० ते १२० किलोमिटर एवढा असेल. टि.व्ही वरील ही बातमी ऐकल्यापासून आम्हा सर्वांच्याच डोळयासमोर

आमच्या परसात असलेल्या ३५ ते ४० फूट उंचीच्या माडाचे चित्र डोळयासमोर दिसू लागले. सध्या हा माड आमचे रहाते घर, शेजारची चाळ आणि एक संडास यांच्या बरोबर मधोमध उभा आहे. एवढ्या मोठ्या वेगाने येणाऱ्या वाऱ्यांपुढे हा आपला माड निश्चितच शरण जाईल आणि कुठल्यातरी घराचा घात करेल असे सतत वाटत होते.

दिनांक ३ रोजी दुपारी बारा वाजले तरी वातावरण शांत होते. वाऱ्याचा अजिबात पत्ता नव्हता. परंतु टी. व्ही वर आणि सर्व माध्यमांवर चक्रीवादळाच्या प्रगतीची रनींग कॉमेंट्री चालू होती. जस जशी ती कॉमेंट्री ऐकत होतो तसे काळजात धस्स होत होते. अखेर एक वाजल्यानंतर वाऱ्याचा वेग वाढायला सुरवात झाली. सर्वचजण आपापल्या घरांत जीव मुठीत घेऊन बसलेले होते. थोड्याच वेळात वीजेने राम म्हटला. त्यानंतर वाऱ्याने आपले तांडव सुरु केले. बघता बघता आमच्या घराचे कोने उडाले त्यानंतर कौलांच्या वरच्या रांगामधील कौले उडाली. शेजारच्या आंगणात असलेल्या आंब्याच्या झाडाने आपले स्थान सोडले. ते झाड आमच्या शेजाऱ्यांच्या पुढच्या पडवीवर पडले. त्याची एक फांदी आमच्या चिक्कूच्या झाडावर पडली. त्यामुळे चिक्कूच्या झाडाच्या एकामागोमाग

एक फांद्या मोडून पडल्या. या प्रकारामध्ये अंगणातल्या मांडवाच्या कोपऱ्यातल्या पत्र्यांनी जमीनीवर उडी मारली. अंगणाच्या उजव्या बाजुला असलेली पोफळ चक्रीवादळात गोल गोल फिरून पिंजली. अखेर तीही मोडून पडली.

आजुबाजुच्या प्रत्येक वाडीतुन काही पडल्याचे, काही मोडल्याचे आवाज येत होते. या वाऱ्याचा झंझावाताच्या जोडीला आता पावसाने सुरवात केली. अखेर दुपारी चारच्या सुमाराला वारा शांत झाला पाऊस कमी झाला. या एवढ्या वाऱ्यामध्ये आमचा परसातला माड मात्र एखाद्या योध्याप्रमाणे त्या तुफानाला तोंड देत ठामपणाने उभा होता. मात्र तो महाकाय वाऱ्याच्या झंझावाताने थोडासा दक्षिणेकडे झुकला होता. आता घराघरामधून लोक बाहेर पडून झालेल्या नुकसानीची पहाणी करीत होते. आमच्या आजुबाजुच्या प्रत्येक घराचे काही ना काही नुकसान झालेले होते. कोणाचे पत्र्याचे पूर्ण छप्पर उडाले होते. तर कोणाची कौले उडाली होती. कित्येक घरांवर जवळची झाडे कोसळली होती. प्रत्येकावरच हा प्रसंग आला होता त्यामुळे कोण कोणाचे सांत्वन करणार हा मोठा प्रश्न होता. वाडीमध्ये जाऊन बघायची त्यादिवशी कोणाची हिम्मतच झाली नाही. परंतु प्रत्येकजण तर्क करत होता. हा सगळा प्रकार

मला माझ्या पुतण्याने रात्री अकरावाजता फोनवर सांगितला. सांगताना तो फक्त रडायचा बाकी होता. जीव मुठीत धरून बसणे म्हणजे काय याचा त्याने प्रत्यक्ष अनुभव घेतला होता.

या महाकाय वादळाच्या पार्श्वभूमीवर या वादळात तग धरून राहिलेल्या आमच्या परसातल्या माडाची धोक्याची टांगती तलवार मात्र डोक्यावर कायम होती. परत केव्हाही वारा सुरु होईल आणि हा माड आपला घात करील ही भीती सतत कायम होती. वास्तवीक माडाला म्हणजे+ नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हणतात. मी माझ्या लहानपणापासून ऐकत आलो होतो की, नारळाचे झाड कधीही कोणाच्याही जीवाला इजा होऊ देत नाही. परंतु तो काळ वेगळा होता. प्रत्येकजण आपल्या मर्यादा पाळून होता. माणूस नेहमी मोठ्या झाडांपासून सुरक्षीत अंतरावर रहात होता. त्यावेळी माडाचा नारळ पडलाय म्हणून किंवा झाप पडलाय म्हणून कोणी जखमी झाल्याचे कधी ऐकले नव्हते. हल्ली शहरांमध्ये आपण बघतो, सोसायटीच्या कंपाऊंडमध्ये नारळाचे झाड लावलेले असते. हळू हळू ते मोठे होते. त्या झाडाखाली कार पार्कींग केली जाते. मग कधीतरी त्या माडाचा झाप अथवा नारळ त्या कारवर पडतो. गाडीचा

पत्रा फाटतो, काच फुटते. याचा दोष त्या माडाला देऊन कसा चालेल.

वादळाच्या परिस्थितीतून सगळे थोडेफार सावरल्या नंतर आमच्या परसातल्या माडाला तोडायचे ठरले. परंतु आता सगळीकडेच झाडे उन्मळुन पडलेली होती. वीजेच्या खांबावर, तारांवर झाडे आणि झाडाच्या फांद्या पडल्या होत्या. अनेक घरांवर झाडे कोसळली होती. त्यामुळे एवढा मोठा चाळीस फूट उंचीचा घरांना धोकादायक झालेला माड तोडायचा म्हणजे कसबी तोड्याची जरुरी होती. आत्ताच्या परिस्थितीत त्यांचीच वानवा होती. कारण प्रत्येकाचेच काम तातडीचे होते. शेवटी आमच्या पाखाडीतील एकाला माझ्या पुतण्याने तयार केले. त्याची एक अडचण होती. त्याच्याकडे एकच कटर होता तो दुसरीकडे अडकला होता. त्यामुळे त्याला कटरची गरज होती. ती गरज देखील पुतण्याने भागवली. श्रीवर्धनमधील सर्व ए.टी.एम्. बंद होती म्हणून लागणाऱ्या पैशाची व्यवस्था करण्याकरीता पुतण्याने महाड गाठले. अशातऱ्हेने आमचा परसातला माड आज धारातिर्थी पडला. हे काम पूर्ण झाल्यावर त्याने मला व्हॉटस् अँपवर वरील मेसेज पाठवला. तो मेसेज

वाचल्यानंतर मला त्या माडाच्या जन्मापासूनचा इतिहास आठवला.

*******

आक्षीच्या स्तंभावरून नागांवला जाणाऱ्या रस्त्यावर लगेचच पेठे गल्ली नावाची गल्ली आहे. त्या गल्लीतुन आत गेल्यावर समोरच पेठ्यांचे खाजगी गणपतीचे मंदिर आहे. त्या मंदिराकडे तोंड करून पेठ्यांचा भलामोठा वाडा आहे. त्या वाड्यामध्ये पेठेकाकू नांवाच्या आजी रहात होत्या. मी त्यांना पहिल्यांदा १९८५ साली पाहिले तेव्हा त्या जवळपास पंचाहत्तर वर्षांच्या असाव्यात. त्यांच्या घरामागे त्यांची नारळा पोफळींची वाडी होती. त्या वाडीच्या पाठिमागे त्यांचे भाट होते. त्या भाटाच्या मागे त्यांचीच शेती होती. वास्तवीक पेठेकांकूंच्या वयाचा विचार करता त्यांना त्यांच्या वाड्याचा पूर्ण केर काढणे देखील शक्य नव्हते. तरीही त्या शेतीवाडी सांभाळायची म्हणून आक्षीत एकट्या रहात होत्या. त्यांची मुलगी नाशिकला तर मुलगा मुंबईला रहात असे.

माझे सासरे त्याच काळात आपला मुंबईचा संसार मोडून गांवी आक्षीला रहायला आले होते. गावी शेती वाडी करायची जोडीला म्हशी घेऊन त्यांनी दुधाचा व्यवसाय सुरु

केला, त्याच्या जोडीला एक बैलजोडी घेऊन ते बैलगाडी भाड्याने लावीत असत. दारात असलेल्या गुराढोरांना चारापाण्याची व्यवस्था करणे मोठे जिकीरीचे काम असायचे. त्याकरीता ते सतत शोधात असायचे. त्याकरीता कुठे वाल निवडायला जा कुठे, भाताची मळणी चालू असेल तर तिथे जाऊन पेंढे खरेदी कर असा त्याचा व्याप चालू असायचा.

याच काळांत एके दिवशी त्यांना पेठेकाकूंचा निरोप आला एकदा येऊन मला भेटून जा. येताना बायकोला देखील आण. पेठेकाकूंचा निरोप समजल्यावर माझे सासरे उभयता पेठेकाकूंना भेटायला गेले. पेठेकाकूंनी त्यांचे आणि माझ्या सासुबाईंचे स्वागत करून झाल्यानंतर दोघांनाही विचारले, अरे बगाराम! माझे आता वय झाले आहे, त्यामुळे दारातल्या गणपतीची पूजा करणे मला जमत नाही रे! तू हल्लीच मुंबईहून आक्षीत रहायला आला आहेस, माझ्या या गणपतीची पूजा करायची जबाबदारी तू घेशील कां?

त्यावर माझ्या सासऱ्यांनी गणपतीची पूजा करायचे कबुल केले. फक्त मीच नव्हे तर घरातिल कोणीतरी येऊन पूजा करून जाईल असे सांगतले. त्यानंतर पेठेकाकूंचा आणि माझ्या

सासुरवाडीचा घरोबा वाढला. पुढे माझे सासरे त्यांचे शेत करु लागले.

काही काळाने आमचे लग्न झाले. आपल्याकडे लग्नामध्ये नवऱ्यामुलींची पाठवणी करताना असोली नारळाने ओटी भरायची पध्दत आहेच. त्याप्रमाणे आमच्या लग्नात पाटवणी करताना ओटी भरण्याकरीता म्हणून पेठेकाकूंनी त्यांच्या भाटातल्या मोहाच्या नारळाची सुकड आवर्जुन पाठवुन दिली होती. या नारळाचे वैशिष्ट म्हणजे हा नारळ सर्वसाधारण नारळाच्या दिडपट ते दुप्पट होईल एवढा मोठा होता. त्या नारळाचे खोबरे खवल्यावर मध्यम आकाराचे एकवीस मोदक सहज होत असत.

लग्नांत ओटी भरलेली ती सुकडीला नंतर मोड आला त्यानंतर तो माडाचा रोपा आम्ही आमच्या परसात लावला. बघता बघता तो रोपा मोठा होऊ लागला. त्याच्या बरोबरच आम्ही दोन सिंगापुरी आणि एक केरळमधील संकरीत नाराळाचे रोपे लावले होते. त्यातील सिंगापुरी माडाला नारळ येऊन आठ दहा वर्षांत ते माड मरून देखील गेले. केरळी माडाला देखील सात आठ वर्षांत नारळ यायला लागले होते. परंतु दहा वर्षे झाली, अकरा वर्षे जाली तरी हा मोहाचा माड

मात्र नुसताच वाढत होता. त्यानंतर मात्र त्या माडाला नारळ यायला लागले.

नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हणतात. त्याला कारण नारळाच्या झाडाचा कोणताच भाग निरुपयोगी नसतो. नारळाचे झाड लहान असले तरी त्याच्यापासुन झाप मिळतात. त्या झापांपासुन विणलेले झाप तयार होतात. पूर्वी घराचे पावसाच्या झडी पासुन रक्षण करण्याकरीता पागोळी बांधायला हे झाप उपयोगी पडत. पावसाळा सुरु होण्यापूर्वी कोळी लोक आपल्या मच्छीमारी नौका बंदरात आणून उभ्या करीत असत. नारळी पोर्णिमा होईपर्यंत त्या नौका शाकारून ठेवीत असत. त्या नौका म्हणजेच गलबते शाकारायला माडाचे विणलेले झाप लागत असत. त्या सिझनमध्ये झापांचे दुर्भिक्ष निर्माण व्हायचे. याशिवाय त्या काळात आडोसा करायला कुड बांधले जायचे त्या कुडांना देखील विणलेले झाप उपयोगी पडायचे. कोंकणातिल गरीबाची झोपडी देखील या झापांनी शाकारलेली आणि आडोसा म्हणून झापांच्या कुडांनी झाकलेली असायची. इतकेच नाही तर त्याकाळात घरोघरी फारसे संडास नव्हते. माडाच्या झापांनी कुडलेले गावठी संडास तेव्हा सगळीकडे सर्रास बघायला मिळायचे. त्याकाळात बाथरुम देखील झापांचे

छप्पर, झापांच्या कुडाच्या भिंती आणि आंघोळीला बसायला मोठ्ठा जांभ्यादगडाचा चौरंग अशा पध्दतीचे असायचे. आता प्लॅस्टीकचा जमाना आला त्यामुळे या इको फ्रेंडली वस्तूकडे दुर्लक्ष झालेले आहे. नारळाच्या झापांच्या पात्यामधील हिर काढले की, त्याची उत्तम केरसुणी होते. तिला मात्र आजही खूप मागणी आहे. हिर काढुन उरलेल्या पात्या पाणी तापवायला जळवण म्हणून उपयोगी पडतात. हा झाला माडाला नारळ येईपर्यंत मिळणाऱ्या उत्पन्नाचा भाग.

माडाला नारळ यायला लागल्यानंतर त्यापासून नारळ मिळतात. ते नारळ सोलल्यानंतर त्याची चोडे एकतर जळणाकरीता उपयोगी होतात. किंवा कसबी कारागिर असेल तर त्या चोडांपासुन उत्तम दोरी तयार करतो. या शिवाय हल्ली या चोडांपासून मॅट्रेसेस तयार करतात त्याला खूप मागणी आहे. नारळाची करवंटी सुध्दा उपयोगी आहे. तिच्यापासून तेल काढतात, ते तेल पावसात पाय सतत पाण्यामध्ये राहिल्यामुळे कुजतात त्यावर उत्तम एक औषध आहे. अशा तऱ्हेने एक नारळाचे झाड कितीप्रकारे उत्पन्न देते हे लक्षांत येते.

काही कारणाने नारळाचे झाड पडले, मोडले किंवा अनेक वर्षांच्या सेवेतून निवृत्त होऊन धारातिर्थी पडले तर त्याचे

खोड देखिल उपयोगी पडते. त्याच्या खोडापासुन घराकरीता टिकाऊ भाले किंवा वासे होतात. आमच्या जुन्या घरात माझ्या पणजोबांपासुनची माडाची भाले होती. जुन्या काळातील घर म्हणजे चार मेढी उभ्या करायच्या त्या मेढींवर माडाचे अखंड न चिरता भाल ठेवायचे, त्यावर माडाचेच खांब उभे करून, त्यावर माडाचेच वासे घालायचे. त्या वाशांवर पोफळीच्या रिफा बांधायच्या त्यावर पोफळीच्या झावळयांनी घर शाकारायचे सर्व वस्तू मागच्या वाडीतल्या असायच्या. हे सगळे बांधण्याकरीता नारळाच्या चोडांपासुन बनवलेली दोरी आणि केळीचे सोपट यांचा वापर व्हायचा. अशा प्रकारे कोंकणातिल लोक या माडाच्या भरवश्यावर आत्मनिर्भर होते.

असा हा आमचा परसातला माड आमच्या लग्नाची जिती जागती आठवण होता. गेली चौतीस वर्षे तो आम्हाला काही ना काही देत आला आहे. हा नारळ मोहाचा होता. जर उतरला तर त्याचे खोबरे खूप गोड लागायचे. नारळाची साईज देखील बाजरात मिळणाऱ्या केरळी नारळाच्या दुप्पट मोठी होती. त्या माडाच्या नारळाची रोपे अनेक ठिकाणी दिली होती. त्यातिल किती या वादळात तग धरून आहेत देवजाणे. आता सुध्दा एवढ्या भयानक वादळात त्याने आम्हाला कोणतीही

हानी पोचवीली नाही. आता तो आम्हाला धोकादायक वाटायला लागला कारण, आम्ही आमच्या मर्यादा ओलांडल्या. आमच्या घरापासुन तीस फुटावर असणाऱ्या या झाडाखाली आम्ही अतिक्रमण केले. आम्हाला रहायला घर कमी पडू लागले, आम्हाला सुखसोई हव्या म्हणून आम्ही त्याच्या छायेखाली गेलो. त्याची शिक्षा त्याने आम्हाला दिली नाही. त्याने आमच्यावर मोह दाखवुन आम्हाला माफच केले. परंतु आम्ही मात्र आमच्या मोहापायी त्याच्या या उपकाराची फेड त्याचा बळी देऊन केली. या जगात मानवाच्या जीवाला जादा महत्व आहे हेच खरे.

अशा या गेली पस्तीस वर्षे माझ्या कुटूंबाच्या सहवासात असणाऱ्या आणि सतत काहीतरी देत रहाणाऱ्या आमच्या या मोहाच्या नारळाला माझी भावपूर्ण श्रध्दांजली.

# ७. रिलायन्स ग्रीन्स एक स्वप्ननगरी




गेले जवळपास एक वर्षभर मी रिलायन्स ग्रीन्स या जामनगर(गुजरात) येथिल टाऊनशिप मध्ये रहात आहे. ही जणू एक स्पप्न नगरीच आहे असे वाटावे असे येथिल वातावरण आहे. जामनगर द्वारका महामार्गावर जामनगर पासुन तिस किलोमिटर अंतरावर असणाऱ्या या स्वप्ननगरीच्या मुख्य प्रवेशद्वारातुन आत प्रवेश केला की आपल्याला लगेचच फरक जाणवतो. गेटच्या बाहेर सर्वत्र हा एक वाळवंटाचाच भाग

असल्यामुळे उजाड वाटणारे वातावरण अनुभवल्यानंतर या नगरीतील प्रसन्नता, हिरवळ मनाला भावते.



स्वच्छ, सुंदर, भरपुर मोठ्ठे असणाऱ्या रस्त्यांवरून आपण घरंगळतच सर्वत्र फिरत असतो. प्रवेशद्वारामधून आत आल्यावर समोरच सेंट्रल गार्डनमधील कारंजी आपले लक्ष वेधून घेतात. रस्त्याच्या कडेला आणि दुभाजकामध्ये रंगिबेरंगी फुले असणारी झाडे आपले मन प्रसन्न करतात. त्यानंतर आपल्याला एक सुबक आणि प्रशस्त आवार असणारे मंदिर दिसते. मंदिर परिसरात असलेली हिरवळ, फुलांची झाडे तेथिल वातावरण अधिकच भक्तीमय करतात.

अनेक सेक्टरमध्ये विभागलेल्या या नगरीतील टापटीप आणि शांतता नेहमीच आपले लक्ष वेधून घेते. प्रत्येक सेक्टरमध्ये लहान मुलांना आणि आजी आजोबांना विरंगुळा

म्हणून गार्डन केली आहेत. तेथे मुलांना खेळण्या साठी आवश्यक असणारे घसरगुंडी, सि सॉ, चक्र उपलब्ध केलेली आहेत. प्रत्येक बागेत हिरवळ आणि फुलांनी बहरलेली झाडे ही कॉमन बाब आहे. आजी आजोबांना गप्पा मारायला आरामदायी आसने ठेवलेल्या शेड केलेल्या आहेत.

येथे ओव्हल पार्क आणि सेंट्रल पार्क ही मोठी मैदाने तयार केलेली आहेत. या दोन्ही ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी मंद सुरात निरनिराळी जुनी नवी गाणी किंवा भजने लावलेली असतात. त्यांचा आवाज देखिल आपण हेड फोनवरून संगित ऐकतोय असा भास व्हावा इतकाच असतो. येथे स्पेशल जॉगिंग ट्रॅक, सायकलिंग ट्रॅक बनवलेला आहे. जवळच मोठ्ठी लायब्ररी, जिम, फुटबॉल, टेनीस, क्रिकेट यांची मैदाने उपलब्ध केलेली आहेत. लायब्ररीमध्ये अनेक भाषांमधील पुस्तके उपलब्ध असतात. याशिवाय दररोजचे निरनिराळया भाषांमधील वर्तमानपत्रे सुध्दा आपल्याला वाचायला मिळतात.  ओव्हल पार्कमध्ये जणू चौपाटीच उभी केली आहे. या नगरीत भारतातिल सर्व प्रांतातुन आलेले लोक आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रांतामधल्या चवीचे पदार्थ येथे आपल्याला खायला मिळतात. येथे अनेक प्रकारचे उत्सव

मोठ्या प्रमाणांत साजरे केले जातात. सार्वजनिक गणपती, नवरात्रीमध्ये गरबा, इंग्रजी नवीन वर्षांचे स्वागत हे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. या शिवाय वर्षातुन एकदा मोठा कार्निव्हल देखिल आयोजित केला जातो. त्यावेळी येथे जत्रेचे वातावरण असते.

एक मोठे सुसज्ज हॉस्पिटल, इंग्रजी माध्यमाची मोठी शाळा, दोन मॉल, तिन ते चार क्लब, पोस्ट ऑफिस, स्टेट बँक, अॅक्सिस बँक, आय्. सी. आय् सी आय् बँक, तिन ए टी एम या सोयी येथे उपलब्ध आहेत. या शिवाय त्रीस्टार हॉटेल, सिनेमा थिएटर, पाच सहा फुड कोर्ट खाद्य शौकिनांकरीता आहेत.

येथे कुठेही आपल्याला पोलिस दिसत नाही. परंतु प्रत्येक टू व्हीलरस्वार हेल्मेट घातलेला आपल्याला दिसतो. एवढेच नाही तर टू व्हिलरच्या मागे बसलेला व्यक्ती देखिल हेल्मेटधारीच दिसतो. कोठेही चोरीमारी झाल्याचे दिसत नाही. चारचाकी गाडीवाला देखिल सिटबेल्टशिवाय गाडी चालवताना दिसत नाही. कोणीही स्पीड लिमिट ओलांडलेला आढळत नाही. मी एकदा रस्ता क्रॉस करीत होतो तेव्हा मला रस्ता क्रॉस करु देण्याकरीता चक्क चारचाकी गाडीवाला

थांबला होता. हा अनुभव मी आजपर्यंतच्या आयुष्यात पहिल्यांदाच अनुभवला.

हल्लीच या नगरीत पर्यावरणाला पुरक असणाऱ्या सायकलचे प्रमोशन सुरु केलेले आहे. मायबाईक या



अहमदाबाद येथिल संस्थेच्या मार्फत येथ सायकलिंग प्रमोशन उपक्रम राबविला जात आहे. संपूर्ण नगरीच्या परिसरात एकुण आठ सायकल टर्मिनल उभारण्यात आलेली आहेत. येथे शंभर रुपये डिपॉझिट भरून जवळपास मोफत सायकल उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. पहिल्या तासाला मोफत आणि पुढील प्रत्येक तासाला पांच रुपये इतक्या अल्प दराने सुसज्ज सायकल मिळतात.

एक टर्मिनल वरून घेतलेली सायकल दुसऱ्या टर्मिनलवर सोडली चालते. यामुळे व्यायाम तर होतोच, शिवाय जवळपासची छोटी मोठी कामे प्रदुषण करणाऱ्या वाहनाशिवाय

उरकता येतात. या करीता सायकलची मरम्मत करण्याचा व्याप देखिल नाही. सायकलमधील हवा चेक करणे, वंगण घालणे, सायकल स्वच्छ करणे ही कामे देखिल करावी लागत नाहित. त्यामुळे येथिल नागरिक या सायकलचा मोठ्या प्रमाणांत फायदा घेताना दिसतात.

देशामध्ये पाचशे आणि हजारच्या नोटा बंद केल्यानंतर केंद्र शासनातर्फे कॅशलेस व्यवहार वाढावेत याच्याकरीता खास प्रयत्न करण्यांत आले. त्याकरीता भिम, पे, पे टिम यासारखी अँप उपलब्ध केली गेली. त्याचवेळी जिओ मनी हे देखिल अँप सुरु केले गेले. या शिवाय डेबिट/क्रेडीट कार्ड यावर देखिल भर देण्यांत आला.




त्याकाळात स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी काही वसाहती कॅशलेस वसाहती म्हणून जाहिर केल्या होत्या. त्यातिलच एक वसाहत रिलायन्स ग्रीन्स ही देखिल होती. कॅशलेस व्यवहार किती सोयीचा असतो हे मला येथे राहून समजले. या नगरीतील प्रत्येक आर्थिक व्यवहार कॅशलेस होतो

आहे. चहाची टपरीवाला, इस्त्रीवाला, धान्य दळणाची गिरणवाला, पाणीपुरीचे/फास्टफुडचे स्टॉल, फळवाला, भाजीवाला, सायकल रिपेअरिंग करणारा, केस कापणारा सर्वजण सहजपणाने भीम अथवा जिओ मनी अँपने पैसे स्विकारतात. मॉलमध्ये, हॉटेलमध्ये भीम, जिओ मनी याशिवाय डेबिट/क्रेडीट कार्डने पैसे स्विकारतात. खिशामध्ये पैशाचे पाकिट ठेवायची जरुरच पडत नाही.

या नगरीतुन जामनगरला जायला अतिशय अल्प दरात दर तासाला बसेस उपलब्ध असतात. या शिवाय नगरीच्या परिसरात हॉस्पिटल, मॉल वगैरे ठिकाणी जाण्याकरीता पांचरुपये इतक्या अल्पदरात व्हॅनची शटल सर्वीस सुरु असते.

या नगरीचे एक विशेष सांगायचे राहूनच गेले. येथिल दिवस उगवतो तो मोरांच्या केकांनी आणि पक्षांच्या मधुर गुंजारवांनी. आपण रस्त्यानी जाताना आपल्या आजुबाजुला अनेक मोर वावरत असतात. कधी योग आला तर त्या मयुरांचे नर्तनही पहायला मिळते. फक्त त्यावेळी आपल्याकडे स्वस्त उभे रहाण्याचे पेशन्स पाहिजेत. आपण काय करतो मोर नृत्य करु लागला की लगेचच मोबाईलमध्ये

व्हीडीओ करायला बघतो. त्या आपल्या हालचालींनी त्या मोराची नर्तन समाधी भंग पावते.



असो ही अशी स्वप्ननगरी मला अनुभवायली मिळाली. आपण सर्वांना देखिल अशाप्रकारचा अनुभव मिळो ही सदिच्छा.

# ८. शिवथर घळ सुंदरमठ एक अनुभव

महाडाहून भोरकडे जाणाऱ्या रस्त्यावर बारसगांव फाट्यावरून आतमध्ये गेले की, सर्वत्र सृष्टीचा चमत्कार पहायला मिळतो. सगळीकडे हिरवे हिरवे डोंगर पसरलेले दिसतात. पावसाळ्यात गेल्यास त्या डोंगरावरून अनेक धबधबे खाली पडताना दिसतात. आजुबाजुला भाताची, नाचणीची, वरीची हिरवीगार शेते या सौंदर्यात आणखिनच भर घालतात. बाकी कुठेही पाऊस नसला तरी शिवथरच्या परिसरात पावसाची हजेरी असतेच. या अशा निसर्गरम्य परिसरातच शिवथरची प्रसिध्द घळ आहे. समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्याने पुनित झालेल्या या परिसराचे वैभव अवर्णनिय आहे. या अशा निसर्गरम्य परिसरात निवांत रहावे असे प्रत्येकाला वाटत असते. परंतु प्रापंचीक माणसांना हे स्वप्नवत असते. दोन चार दिवस राहिले की, आपले घर संसार डोळ्यापुढे यायला लागतो.

स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर मलाही हे स्वप्न खूणावत होते. त्यामुळे मी जेव्हा कोजागिरी पोर्णिमेच्या सुमारास शिवथर घळीत गेलो होतो तेव्हा मला तेथिल व्यवस्थापना करीता स्वयंसेवकांची जरुरी असल्याचे समजले. मला ती संधी वाटली

म्हणून मी लगेचच आम्हा उभयतांच्या संमतीचा फॉर्म भरून दिला. त्यानंतर लगेचच मे महिन्यात आम्हाला मासिक व्यवस्थापक म्हणून काम करण्याविषयी विचारले गेले. तेव्हा मी देखिल हो म्हटले. परंतु संकल्प आणि सिध्दी या मध्ये नियती असते हे माझ्या लक्षांतच आले नाही. काहीतरी प्रापंचिक अडचण आली आणि मी या संधीचा लाभ घेऊ शकलो नाही. त्यानंतर सुमारे पांच वर्षे अशीच शिवथर येथे रहाण्याचे स्वप्न बघण्यात गेली.



परंतु यंदाच्या ऑगस्ट महिन्यात हा योग जुळून आला. दिनांक ३१ जुलै रोजीच शिवथरला जाण्याचे प्रस्थान ठेवले. महाड पर्यंत राज्य परिवहन बस, महाड पासुन बिरवाडी आणि

त्यानंतर बिरवाडी बाग ते शिवथर घळ सहा आसनी रिक्षाने प्रवास करीत शिवथर घळीत दाखल झालो. सुंदरमठाच्या सुंदर प्रवेश द्वाराने आमचे स्वागत केले साक्षीला प्रपात होताच.

घळीत दाखल झाल्यानंतर आम्हाला रहाण्यासाठी खोली देण्यांत आली. त्यावेळी घळीत प्रापंचिकांचा दासबोध अभ्यास वर्ग चालू होता. त्यामुळे तेथे जवळपास शंभर लोक मुक्कामाला होती. मी घळीत होतो त्या मुदतीत अतीवृष्टीने थैमान घातले होते. माझ्या वास्तव्याच्या काळात धबधब्याचा वेग आणि प्रवाह प्रचंड वाढला होता. गेली अनेक वर्षे मी या पवित्र ठिकाणी येत आहे. परंतु अशा प्रकारचे दृष्य पहाण्याचा योग कधी आला नव्हता.

माझ्या दृष्टीने शिवथर घळ हे नुसते समर्थ स्थान म्हणून पवित्र नाही तर आणखी बरेच काही आहे. कारण मला प. पू. आक्का वेलणकर यांचेकडून याच घळीत अनुग्रह मिळाला होता. या पवित्र स्थानाला फार मोठा इतिहास आहे. समर्थकालिन इतिहास तर आहेच, त्याचबरोबर अनेक वर्षे दुर्लक्षित असणाऱ्या या स्थानाचा शोध घेऊन त्याचे परत सुंदरमठात रुपांतर करणे या संपूर्ण घटनांचा इतिहास पाहणे फार रोचक आहे.

अतिशय दुर्गम असणारे हे स्थान शिवकालात चंद्रराव मोऱ्यांची जहागिर होती. त्या चंद्रराव मोऱ्यांना शिवाजी महाराजांनी पुनर्स्थापित केले होते. तेच मोरे परत शिरजोर होऊन शिवाजी महाराजां विरुध्द विजापुरच्या बादशहाकडे कागाळ्या करत होते. ते जावळी खोरे स्वराज्यात सामिल व्हावे या दृष्टीने पार्श्वभूमी तयार करावी म्हणून समर्थ शिवथर घळीत जवळपास दहा वर्षे वास्तव्यास होते.

बारा वर्षे टाकळी येथे तपश्चर्या, बारा वर्षे देशाटन केल्यानंतर समर्थांनी कृष्णाकाठ ही आपली कर्मभूमी ठरवली होती. त्या कृष्णेच्या परिसरात चाफळ येथे प्रभु श्रीरामांचे मंदीर स्थापन करून त्यांनी स्वराज्याला परमेश्वराचे अधिष्ठान प्राप्त करून दिले होते. या साऱ्या अनुभवाचा फायदा आपल्या शिष्यांना आणि समाजाला  व्हावा म्हणून समर्थांनी दासबोधा सारख्या बहू आयामी ग्रंथाची निर्मिती करण्याचे ठरविले होते. त्याकरीता त्यांना निवांतपणा आणि एकांत पाहीजे होता. म्हणूनच कोणाचाही उपद्रव न होता निवांत लेखन करता यावे या उद्देशाने समर्थांनी शिवथर घळी सारख्या दुर्गम स्थानाची निवड केली होती.

घनदाट आणि निबिड अशा झाडांनी वेढलेल्या या नैसर्गिक घळीच्या परिसरात अनेक हिंस्त्र श्वापदांचा वावर असे. घळीच्या तोंडावरच प्रचंड प्रपात पडत होता. असे विलक्षण स्थान असणाऱ्या या शिवथर घळीचे वर्णन समर्थांनी असे केले होते.




हल्लीच्या काळातिल श्री राम वेळापुरे (संस्कृत दासबोधकार) यांनीही शिवथर घळीवर "शिवकन्दराष्टकम्" लिहिले आहे ते मला एका जुन्या सज्जनगड मासिकात वाचायला मिळाले ते येथे देत आहे. त्यांनी केलेल्या घळीच्या वर्णनामध्ये त्यांनी या स्थानाला महाराष्ट्र संजीवनी म्हटले आहे आणि ते खरेच आहे. शिवथर मध्ये राहून गेल्यानंतर माणूस

रिचार्ज होतो. त्याला परत प्रापंचिक जिवन जगण्यासाठीची शिदोरी येथे प्राप्त होते.




महाभारता सारखे मोठे काव्य लिहिताना महर्षी व्यासांना प्रश्न पडला होता की, याचे लेखन कोण करेल, तेव्हा त्यांनी प्रत्यक्ष विद्येची देवता गणपतीला लेखक होण्याची विनंती केली. तेव्हा त्याने लेखन करताना मी थांबणार नाही अशी अट घातली होती. दासबोधाचे लेखन करणारा लेखक देखिल तसाच महान होता. त्याची बुध्दी देखिल तितकीच तेजस्वी होती. समर्थांचा पट्टशिष्य कल्याण स्वामी समर्थांच्या बरोबर लेखक म्हणून आले होते. मात्र ते समर्थांच्या बरोबर न रहाता तेथुन जवळच असणाऱ्या नलावडे पठार येथे रहात

असत त्या पठाराला सद्या रामदास पठार म्हणून ओळखले जाते. कल्याणस्वामी हे एकपाठी होते. तल्लख होते. याची प्रचिती आपल्याला पळणीटकर गुरुजी यांच्या समर्थ चरित्रातील डाळगप्पू या गोष्टीवरून येते. ते दररोज सूर्योदयापूर्वी आपले आन्हीक उरकुन लेखनाकरीता घळीत हजर असत.

या स्थानाला प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनी भेट दिलेली आहे. रायगड, प्रतापगडाच्या निर्मितीचे स्वप्न महाराजांनी येथेच पाहिले आहे. समर्थांच्या वास्तव्याच्या काळात शिवथर घळीत गणेशउत्सव साजरा होत असे. त्याबद्दल गिरिधर स्वामींच्या पुढील रचनेत आपल्याला उल्लेख सापडतो.

**समर्थे सुंदरमठी गणपती केला ।**
**दोनी पुरुषे सिंदूरवर्ण अर्चिला ।।**
**सकळ प्रांतासी महोच्छाव दाविला ।**
**भाद्रपद मासा पर्यंत ।।**

समर्थांच्या जिवनाची **मुख्य हरिकथा निरूपण| दुसरें तें राजकरण | तिसरें तें सावधपण| सर्वविषईं ||१|| चौथा अत्यंत साक्षप| फेडावे नाना आक्षप | अन्याये थोर अथवा अल्प| क्ष्मा करीत जावे ||२||** ही चतु:सूत्री होती. त्यामुळे नुसते दासबोधाचे लेखन हा समर्थांचा घळीत रहाण्याचा उद्देश

नक्कीच नव्हता. समर्थांच्या शिवथर घळीतील वास्तव्याच्या काळांत शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा वध केला. त्याकरीता परमेश्वराचे अधिष्ठान समर्थांनी पुरवीले होते. केवळ एवढेच नाही, समर्थांच्या शिष्यवर्गाने या काळात गुप्तहेराची कामे केली होती. जावळी खोऱ्यात ज्या प्रतापगडावरती अफजल खानाला मारलं त्या प्रतापगडावर समर्थांचा मठ होता. तिथूनच पाच मैलावरती पारगाव खंडाळा येथे समर्थ रामदासांचा मठ होता. पसरणीला आणि महाबळेश्वरला समर्थ रामदासांचा मठ होता. महाबळेश्वरहून साताऱ्याला जाताना मेढा मधे लागतं, त्या मेढ्याला समर्थ रामदासांचा मठ होता. पाचगणीच्याखाली कण्हेरी नावाच गाव आहे तिथे समर्थ रामदासांचा मठ होता. कण्हेरीपासून दहा मैलावर शिरवळ आहे तिथे समर्थ रामदासांचा मठ होता. याचा पुरावा विजापुरचा सरदार निघाला आहे अशी ओव्यांची आद्याक्षरे असणारे समर्थांचे शिवाजीमहाराजांना लिहिलेले पत्र आहे.

त्याशिवाय समर्थांनी दासबोधातील उत्तमपुरुष निरुपण या समासात अफजलखानाचे वर्णन **तुंड हेंकाड कठोर वचनी| अखंड तोले साभिमानी | न्याय नीति अंतःकर्णीं| घेणार नाहीं ||१|| तऱ्हे सीघ्रकोपी सदा| कदापि न धरी मर्यादा | राजकारण संवादा| मिळोंचि नेणें ||२|| ऐसें लौंद बेइमानी|**

**कदापि सत्य नाहीं वचनीं |पापी अपस्मार जनीं| राक्षेस जाणावें ||३||** असे केले आहे. अशा बेईमानी राक्षसाशी समजुतदारपणा असणारच नाही. तेव्हा सावध राहून योग्यप्रकारे त्याचा मुकाबला करावा असे **म्लेच दुर्जन उदंड| बहुतां दिसाचें माजलें बंड | याकार्णें अखंड| सावधान असावें ||** या ओवीत म्हटले आहे. त्याच समासात **धर्मस्थापनेचे नर| ते ईश्वराचे अवतार | जाले आहेत पुढें होणार| देणें ईश्वराचें ||** असे शिवाजीमहाराजांचे वर्णन केलेले आपल्याला पहायला मिळते.




असो हा झाला शिव-समर्थ कालीन शिवथरघळ सुंदरमठाचा इतिहास. आता आपण हल्लीचा इतिहास बघुया. शिव-समर्थांच्या निर्याणानंतर या स्थानाकडे सर्वांचेच दुर्लक्ष

झाले होते. परंतु समर्थांचा इतिहास आणि त्यांचे वाङ्मय यांच्या शोधाचा ध्यास घेतलेल्या समर्थ ह्रदय नानासाहेब देव यांनी अनेक कागदपत्रांच्या सहाय्याने सध्याच्या शिवथर घळीचा शोध घेतला. त्याकाळात या स्थानाला गोसाव्याची घळई असे संबोधले जायचे.

शिवथर घळीचा शोध संपल्यानंतर या स्थानाची सर्वसामान्य जनतेला, शिव-समर्थ भक्तांना ओळख करून देण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु झाल्या. सन १९६० मध्ये भगवान श्रीधरस्वामींच्या हस्ते येथे समर्थांच्या आणि कल्याणस्वामींच्या मूर्तींची स्थापना करण्यांत आली. मूर्ती स्थापना झाल्यावर त्यांची दैनंदीन पूजा अर्चा करण्यांत मोठ्या अडचणी होत्या. कारण येथे येण्याकरीता पायवाटेशिवाय मार्ग नव्हता. आजुबाजुला किर्र जंगल, त्यामध्ये श्वापदे वावरत होती. वाटेत नदी होती. यातुन मार्ग काढुन समर्थभक्त नारायणबुवा पोतनिस आणि समर्थभक्त महादेव नारायण बेंद्रे यांनी दैनंदिन पूजेकरीता आणि नैवेद्याकरीता येथे रहायचे ठरविले. परंतु येथे रहाणे म्हणजे जिवावर उदार होण्यासारखेच होते. कारण येथे वाघोबा सारखे प्राणी खुलेआम फिरत होते. त्यावर उपाय म्हणून

ते बांबुच्या सहाय्याने केलेल्या पिंजरावजा घरांत ते रहायचे आणि जंगली प्राणी खुले वावरायचे.



अशा प्रकारे काही वर्षे गेल्यानंतर कै. मामा गांगल यांनी या स्थानाच्या कारभाराची जबाबदारी स्विकारली. त्यांनी अनेक समर्थ भक्तांशी संपर्क साधून निरनिराळ्या व्रतांच्या उद्यापनाद्वारे खूप मोठा निधी जमा केला. सुरवातिला साध्या शेडमध्ये भक्तांची सोय करण्यांत येत असे. मामांच्या आणि त्यांच्या बरोबरीने काम करणाऱ्यांच्या अथक प्रयत्नाने सध्या दिसत असलेले सुंदरमठाचे स्वरुप दिसत आहे. सध्या घळीत कल्याण मंडप, गजानन मंडप यासारखे मोठ्ठे हॉल, सुसज्ज

स्वंयपाकघर, समर्थभक्तांना रहाण्यासाठी अनेक खोल्या उपलब्ध असतात.

घळीत अनेक मोठे कार्यक्रम होतात. त्यात मुलांकरीता संस्कार वर्ग, प्रापंचिकांकरीता दासबोध अभ्यास वर्ग, प. पू. आक्का वेलणकर यांनी चालू केलेला दासबोधाचा सखोल अभ्यास या उपक्रमाचा सप्ताह असे मोठी उपस्थिती असलेले कार्यक्रम होतात. याशिवाय अनेक ग्रुप दासबोध पारायणाकरीता येत असतात. कधी कधी चारशे पाचशे माणसे देखिल वस्तीला असतात. याशिवाय दासबोध जन्मोत्सव येथे मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

दररोज पहाटे साडे पांचवाजता पक्षांच्या किलबिलाटात, मोरांच्या केकांच्या पार्श्वसंगिताच्या साथिने भूपाळया आणि काकड आरतीने येथिल दिवस सुरु होतो. त्यानंतर दिवसभरात पारायण, पूजन अर्चन इत्यादि अनेक कार्यक्रम चालू असतात. संध्याकाळी साडे सहावाजता सांप्रदायिक उपासना केली जा ते. यामध्ये समर्थांची करुणाष्टके, सवाया, निरनिराळी अष्टके, दासबोध-मनोबोध वाचन, आरती, रामनाम जप यांचा समावेश असतो. संध्याकाळच्या उपासनेची सांगता कल्याणकारी रामराया या प्रार्थनेने होते. या सर्व

कार्यक्रमांत सहभागी झाल्याने मनाला समाधान मिळते. प्रपंच विसरायला होतो. त्यातच जर घळीमध्ये धबधब्याच्या रुद्रगंभिर आवाजाच्या साथीने ध्यानाला बसल्यास शरिराची आणि मनाची बॅटरी चांगली चार्ज होते.

हल्लीच घळीत समर्थ चरित्राचे चित्ररुप प्रदर्शन लावलेले आहे. या प्रदर्शनात मोठी मोठी पुस्तके वाचुन जे समजणार नाही ते १५-२० मिनिटांत ही चित्रे आणि त्यांचे वर्णन करणारा थोडक्यांत मजकूर यांच्या सहाय्याने समजते. हे एक वेगळेच माध्यम आहे. हल्ली लोकांना पुस्तके वाचणे नको असते त्या ऐवजी हे माध्यम सोपे आहे. पूर्वी हे प्रदर्शन फिरते होते. जबलपुर येथील श्री सुरेश तोफखानेवाले यांनी या चित्रप्रदर्शनाची निर्मिती केली आहे. आपण हल्ली पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे थोडक्यांत एखाद्या प्रकल्पाची माहिती सादर करतो तसेच हे थोडेसे आहे. येथे भेट देणाऱ्या प्रत्येकाने हे प्रदर्शन आवर्जुन पहायलाच हवे.

शिवथर घळ येथील धबधबा हे आणखीन एक आकर्षणाचे केंद्र आहे. तरुणाईला येथील धबधबा भुरळ घालतो. सेल्फी घेणे, धबधब्याच्या पार्श्वभूमिवर फोटो घेणे याचे आकर्षण तर सर्वांनाच असते. त्यामुळे पावसाळयांत येथे भेट

देणाऱ्या भक्तांची रिघ लागलेली असते. अशा या पवित्रस्थानी सेवा करण्याच्या निमित्ताने आम्हा उभयतांना तेथे रहायची आणि तेथिल दिव्य अनुभव घेण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य होते.

शिवथर घळीतील बहुसंख्येने असलेली माकडे हे येथिल खास वैशिष्ट आहे. येथे भेट देणारे पर्यटक त्यांना काहिना काही खायला घालतात. परंतु त्यांचे तेवढ्या अल्प खाण्याने समाधान होत नाही. त्यामुळे जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा ती माकडे पर्यटकांचे सामान पळवत असतात. परंतु त्यांनी माणसांना इजा केली आहे असे क्वचितच घडले असेल. मोठ्या संख्येने असुन देखिल ती माणसांना घाबरतात. असे जरी असले तरी ते शेवटी माणसाचे पूर्वज आहेत. त्यांच्याकडे बुध्दीचे देणे परमेश्वराने दिलेले आहे. याचा प्रत्यय मला एकदा आला. मी श्रीधर स्वामी सभागृहातिल चित्रप्रदर्शन उघडून बसलो होतो. तेव्हा चार पाच माकडे दारा पर्यंत आली म्हणून मी जिन्याला असलेली कोल्याप्सेबल ग्रील बंद केले. तर ती माकडे माझ्या नाकावर टिच्चून त्या ग्रील्समधूनच आपले अंग चोरून जिन्यामध्ये दाखल झाली.

आमच्या वास्तव्याच्या काळांत म्हणजे, श्रावण प्रदिपदे पासुन ते अगदी नारळी पोर्णिमे पर्यंत पावसाने नुसते थैमान घातले होते. दिवसभरात काही तासच पाऊस कमी व्हायचा. त्याकाळांत धबधब्याची निरनिराळी रुपे पहायला मिळाली. शिवथर घळीत येण्याचा मार्ग चालू असला तरी वरंधाघाट, महाबळेश्वर घाट, कशेडी घाट हे सर्व घाट बंद होते. महाड, रोहा, नागोठणे, चिपळुण, खेड, राजापुर या सर्व शहरांत पाण्याने



शिवथर घळीतील धबधब्याचे श्रावण शुध्द प्रतिपदा ते पोर्णिमा या काळातील बदलते रुप.

थैमान घातले होते. त्यामुळे घळीत कोणतेही वाहन येत नव्हते.

मला गणपती, समर्थांच्या आणि कल्याणस्वामी यांच्या मूर्तींची आणि मारुतिरायाच्या पूजेची जबाबदारी दिली होती. तर सौ. वर्षा काऊंटर मदत करत होती. आमच्या तेथिल वास्तव्याच्या काळांत वीज गायब होणे हे नित्याचे झाले होते.

त्यामुळे उपासना करायला अथवा पूजा करायला बॅटरी किंवा मोबाईलच्या बॅटरीचे सहाय्य घ्यावे लागत असे. महाड बंद असल्याने पूजेकरीता फुले येणे बंद झाले होते. त्यामुळे घळीत उपलब्ध असणाऱ्या साधन सामुग्रीवर पूजा करावी लागत असे.



**समर्थ रामदास स्वामींच्या समोर पंचसूक्त पवमानाचे पठण**

भगवद्गीते भगवंतांनी म्हटले आहे, **पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।** त्या प्रमाणे दुर्वा तुळशी तगरीची दोन चार फुले यांच्या सहाय्याने भागवावे लागत होते. तरीही त्या पूजेने समाधान मिळत होते. रोज पुरुषसूक्त, श्रीसूक्त आणि रुद्र यांचे पठण घळीतिल मंदिरात होत होते. पंच सूक्त पवमानाची संथा घेतल्यापासून ज्या ठिकाणी अनुग्रह घेतला

तेथे त्याचे पठण करावे ही इच्छा होती, ती पुरी झाली. श्रावण शुध्द एकादशीच्या दिवशी पंचसूक्त पवमानाचे पठण समर्थांच्या समोर आणि जेथे अनुग्रह प्राप्त केला त्या स्थानी करता आले याचा खूपच आनंद झाला.

रामदासी संप्रदायामध्ये मारुति उपासनेला फार महत्व आहे. समर्थ जिथे जिथे गेले तिथे त्यांनी शक्ती आणि बुध्दीच्या या देवतेची स्थापना केलेली आढळते. आमच्या या वास्तव्या दरम्यान श्रावणातिल तिसरा शनिवार आला होता. या दिवसाचे वैशिष्ट म्हणजे या दिवशी मारुती उपासना करण्याचा प्रघात गेली अनेक वर्षे चालू आहे. समर्थ स्थापित अकरा मारुती ज्या चाफळच्या परिसरात आहेत तेथे या उपासनेची सुरवात झाली आहे. एकावेळी एकाच दिवशी ही सामुहिक उपासना केली जाते. या उपासने मध्ये सर्वप्रथम गणेश वंदना, जय जय रघुवीर समर्थ हा गजर, तेरा वेळा समर्थ रामदासस्वामी विरचित मारुति स्तोत्राचे तेरा वेळा पठण, रामरक्षा, श्रीराम जयराम जयजय राम या त्रयोदशाक्षरी मंत्राच्या अकरा माळा जप, आरती, प्रसाद आणि कल्याणकरी रामराया या प्रार्थनेने सांगता असा क्रम असतो. योगायोगाने समर्थ वास्तव्याने पुनित असलेल्या स्थळी ही उपासना आम्हाला करता आली.

शिवथर घळीत रहाण्याचा फायदा असा आहे, की येथे कोणत्याही मोबाईलला नेटवर्क उपलब्ध नसते. त्यामुळे जगाच्या संपर्कापासुन दूर होतो. नो फेसबुक, नो व्हॉटस् अँप, नो ईमेल त्यामुळे कोणताही डिस्टर्ब नव्हता. एकंदरीत सुंदरमठातिल हे वास्तव्य आनंदाचे, उत्साहाचे आणि आत्मिक शक्ती वाढवणारे होते.

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## श्री अनिल वाकणकर यांचे हे आठवे पुस्तक.

अनिल वाकणकर हे सात्विक वृत्तीचे लेखक आहेत. त्यांची वृत्ती भाविक आणि भाषा रसाळ. त्यांना सारे जगही त्यामुळे सुंदर आणि सात्विक दिसते, आणि त्यांच्या शब्दांतून त्यांचे हे भाव प्रकटतात. त्यांचे लेखन वाचून एक शांती, एक सुकून मिळतो. अशा पुस्तकांनी सामाजिक सौख्य, शांती आणि सौहार्द यांची वाढ होते. त्यामुळे अशी पुस्तके समाजात जास्तीत जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते.

अनिल वाकणकर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर (८ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (५), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे

(ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), पुनम संगवी(४), डॉ. नंदिनी धारगळकर (८)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।